म. ग्रं. सं. ठाणें

विषय

संग्रहालय क्रमांक

लेखक

पुस्तकाचें नांव

सन

36

सं. क्र.

भाग १

(भू प्रवास)

म. ग्रं. सं. ठाणे
विषय
सं. नं.

# भूगोलविद्येचीं मूलतत्वें.

## भाग १.

## ( मुंबई इलाख्याचें वर्णन. )

DEPARTMENT OF PUBLIC INSTRUCTION
BOMBAY

किंमत एक आणा.

The Department of Public Instruction, Bombay.

# AN ELEMENTARY GEOGRAPHY.

## PART I.

(DESCRIPTION OF THE BOMBAY PRESIDENCY.)

BY

RÁO SÁHIB SITÁRÁM VISHVANÁTH PATAVARDHAN, B. A.

**EIGHTH EDITION.**
35,000 Copies.

*(Registered for Copy-right under the Government of India's Act XXV of 1867.)*

BOMBAY:
GOVERNMENT CENTRAL BOOK DEPÔT.

1889.

(All rights reserved.)

*Price 1 anna.*

BOMBAY.

Printed at the "Nirṇaya-sâgar" Press.

मुंबई इलाख्यांतील सरकारी विद्याशाळाखातें

# भूगोलविद्येचीं मूलतत्वें.

## भाग १.

## ( मुंबई इलाख्याचें वर्णन. )

हें,

**रा.सा. सीताराम विश्वनाथ पटवर्धन, बी.ए.**

ह्यांनीं केलें.

---

आवृत्ति आठवी.—३५,००० प्रती.

---

( ह्या पुस्तकाची मालकी सन १८६७ च्या २५ व्या आक्टाप्रमाणें नोंदली असे. )

**मुंबई:**

गवर्नमेंट सेंट्रल बुक डीपो.

सन १८८९.

ह्या पुस्तकासंबंधीं सर्व अधिकार सरकारानें आपलेकडे ठेविले आहेत.

किंमत एक आणा.

मुंबई.
"निर्णयसागर" छापखान्यांत छापिलें.

४५३८०

# प्रस्तावना.

नवीन सुधारलेल्या इयत्तांप्रमाणें मराठी तिसरी इयत्ता शिकणाऱ्या मुलांस, मुंबई इलाख्याचे नकाशाची माहिती असणें अवश्य आहे; परंतु नुस्त्या नकाशावरून ही माहिती मुलांस करून देतां येत नाहीं, ह्मणून ती मुलांस थोडक्यांत करून देतां यावी ह्या हेतूनें, हें लहानसें पुस्तक तयार केलें आहे.

इलाख्याचे निरनिराळ्या भागांचें क्षेत्रफळ व त्यांतील लोकसंख्या ह्यांची माहिती, मुंबई सरकारचे सन १८७२।७३ सालचे अद्मिनिस्त्रेशन रिपोर्टावरून घेतली आहे.

हें पुस्तक मेहेरबान दैरेक्तर साहेब बहादूर ह्यांचे हुकमानें तयार केलें आहे, व ह्यांतील माहिती, आ. साहेबांच्या सहायानें मला मिळाली आहे, ह्मणून मी त्यांचा फार आभारी आहें.

मेहेरबान होप साहेब बहादूर, ह्यांनीं केलेल्या गुजराथी भूगोलाचे प्रस्तावनेपैकीं कांहीं भाग पुढें घेतला आहे, त्याचा उपयोग नकाशा शिकवितेवेळीं बराच होईल, अशी आशा आहे.

“ जेथें मुलें बसलीं असतील त्या जागेचा शिक्षकानें फळ्यावर नकाशा काढावा, व नकाशा काढतेवेळीं मुलांस सूचक प्रश्न करावे. मुलांचे सहायानें, नकाशा संपल्यावर व त्याविषयींची त्यांस पूर्ण माहिती झाल्यावर तो एका मोठ्या जागेचा लहान नकाशा आहे असें शिक्षकानें त्यांस नीट समजावून सांगावें.

जागा लांबट असल्यास शिक्षकानें चौरस आकृति काढून ती बरोबर आहे किंवा नाहीं असें मुलांस विचारावें, व त्यांकडून बरोबर उत्तरें काढून घेऊन त्यांप्रमाणें नकाशाची आकृति

नीट करावी. असें केल्यानें मुलांची समजूत चांगली होत जाईल. जागा चौरस असल्यास, प्रथम लांबट आकृति काढावी; ह्याप्रमाणें शिक्षकानें अशा कांहीं युक्तींची योजना करावी कीं, जेणेंकरून आपण जें कांहीं शिकवितों तें मुलांना बरोबर समजतें किंवा नाहीं हें आपणास कळेल, व तें मुलांचे ध्यानांत चांगलें राहील. नंतर उत्तर, दक्षिण व पूर्व, पश्चिम ह्या दिशा त्यांना नीट समजावून द्याव्या.

मग प्रत्येक दिशेस आपल्या भोंवतालचीं जितकीं घरें फळ्यावर दाखवितां येतील, तितकीं दाखवून एका रस्त्याचा नकाशा पूर्ण करावा. हा नकाशा मुलांस समजल्यावर, तो पुसून टाकून दुसरा लहान त्याऐवजीं काढावा, मग त्याचे प्रत्येक बाजूस मोठमोठ्या रस्त्यांपैकीं कांहीं रस्ते जोडावे. ह्याप्रमाणें सर्व शहराचा किंवा खेड्याचा नकाशा पुरा करावा. गांवासभोंवताला तट असल्यास तो रेघांनीं दाखवावा. ह्या नकाशाची मुलांस चांगली माहिती झाली ह्मणजे तो पुसून टाकून त्याऐवजीं बारीक माहिती शिवाय करून दुसरा लहान नकाशा काढावा.

मग ह्याला, मुलांच्या माहितीचीं गांवें जोडावीं, नंतर प्रत्येक दिशेकडील पलीकडच्या गांवांचीं नांवें मुलांस विचारावीं, उत्तरें बरोबर न आल्यास, त्यांच्या चुक्या दुरुस्त कराव्या. आतां अंतर ह्मणजे काय ? हें मुलांस समजावून सांगावें. भोंवतालचे गांवांचीं नांवें ओळीनें व त्यांमधील अंतरांचे मानानें लिहावीं, ह्मणजे गांवांच्या व शहरांच्या नांवांमधील जें नकाशावर कमी ज्यास्ती अंतर दिसतें, तें निरर्थक नाहीं, असें मुलांस कळूं लागेल.

ह्याप्रमाणेंच टेंकड्या, तळीं, नद्या व आणखी जें कांहीं त्या

गांवांजवळ असेल तें, त्या नकाशावर दाखवावें. ज्या तालुक्यांत किंवा परगण्यांत शाळा असेल त्याचा ह्याप्रमाणेंच नकाशा काढावा, व ह्याची चांगली माहिती झाल्यावर शिक्षकानें त्याऐवजीं दुसरा लहानसा नकाशा काढून त्याला दुसरा तालुका जोडावा, व त्याच्या दिशा, मर्यादा वगैरे दाखवाव्या. मग तो दुसरा तालुका नुसताच मोठ्या आकाराचा काढावा आणि त्यावर त्या तालुक्याची विशेष बारीक माहिती दाखवावी.

अशा रीतीनें सर्व जिल्ह्याचा नकाशा मुलांस शिकवावा. परंतु ज्या तालुक्यांत शाळा असेल त्याखेरीज दुसऱ्या तालुक्यांची विशेष बारीक माहिती देऊं नये. प्रदेशाचे मानानें जसजसा नकाशा वाढेल तसतशी कमी माहिती द्यावी. नकाशावर नद्या वांकड्या रेषांनीं, तळीं वर्तुळांनीं, गांवें व शहरें टिंबांनीं, दाखविलीं आहेत असें मुलांस समजावून द्यावें.

ह्याप्रमाणेंच इतर माहिती सांगावी. सर्व जिल्हे व संस्थानें अशीं एकत्र केलीं ह्मणजे मुलांस सर्व महाराष्ट्राची माहिती होईल. महाराष्ट्राला गुजराथ व मुंबई इलाख्याचे दुसरे भाग एकामागून एक जोडावे, परंतु गुजराथ व इतर भागांची माहिती महाराष्ट्रापेक्षां कमी द्यावी.

# सामान्य माहिती.

## दिशा.

☞ शिक्षकानें दिशांची आकृति फळ्यावर काढावी. ज्या दिशेस सूर्य उगवतो ती पूर्व, ज्या दिशेस सूर्य मावळतो ती पश्चिम, पूर्वेकडे तोंड करून उभें राहिलें असतां जी दिशा डाव्या हाताकडे असते ती उत्तर, व जी उजव्या हाताकडे असते ती दक्षिण.

दक्षिण आणि पूर्व ह्या दोहोंच्या मधील कोणास आग्नेय दिशा ह्मणतात.

दक्षिण आणि पश्चिम ह्या दोहोंच्या मधील कोणास नैर्ऋत्य ह्मणतात.

उत्तर आणि पूर्व ह्या दोन दिशांमधील कोणास ईशान्य ह्मणतात.

उत्तर आणि पश्चिम ह्यांमधील कोणास वायव्य ह्मणतात.

नकाशा हातांत घेतला असतां वरचे अंगास उत्तर, खालचे अंगास दक्षिण, उजवे बाजूस पूर्व, व डावे बाजूस पश्चिम, याव्यात अशा रीतीनें तो काढलेला असतो, हें मुलांस चांगलें समजावून द्यावें.

# भूगोलविद्येंतील शब्दांच्या व्याख्या.

## जमीन.

(१) चोहोंकडून पाण्यानें वेष्टित जो जमिनीचा प्रदेश, त्यास बेट असें ह्मणतात.

(२) तिहींकडून पाणी असून जो जमिनीचा प्रदेश चौथे बाजूनें दुसऱ्या जमिनीशीं जोडलेला असतो त्याला द्वीपकल्प ( बहुतेक बेट ) असें ह्मणतात.

(३) जमिनीचे उंचवट्यास टेंकडी, व फार मोठा उंचवटा असल्यास त्यास पर्वत असें ह्मणतात. टेंकड्या आणि पर्वत तळांशीं एकमेकांना जोडलेले असल्यास त्यांना पर्वत किंवा डोंगर ह्यांच्या ओळी किंवा रांगा, असें ह्मणतात.

(४) पर्वत किंवा टेंकड्या ह्यांमधील सखल प्रदेशास खिंड किंवा खोरें असें ह्मणतात.

(५) सपाट जमिनीचा जो मोठा प्रदेश त्याला मैदान असें ह्मणतात.

(६) उंच मैदानास डोंगरसपाटी किंवा पठार ह्मणतात.

(७) ज्या उंचप्रदेशांतून पाणी चोहोंकडे जातें, त्यास पाणलोट ह्मणतात.

## पाणी.

(१) पृथ्वीचे पृष्ठभागावर जें खारें पाणी आहे, त्याचे पांच भाग केले आहेत; त्या प्रत्येकास महासागर असें ह्मणतात. महासागरापेक्षां लहान असा जो जलसमूह त्यास समुद्र असें ह्मणतात.

(२) जो समुद्राचा भाग जमिनीवर लांब गेलेला असतो, त्यास अखात असें ह्मणतात.

(३) जमिनीनें वेष्टित जो उदकप्रदेश त्यास सरोवर असें ह्मणतात.

(४) पर्वतापासून किंवा सरोवरापासून पाण्याचा प्रवाह निघून जो उतार जमिनीवरून वाहत जाऊन, समुद्रास किंवा दुसऱ्या उदकप्रवाहास मिळतो त्यास नदी असें ह्मणतात.

(५) ज्या ठिकाणाहून नदीचा प्रवाह निघतो त्यास तिचा उगम असें ह्मणतात, आणि ज्या ठिकाणीं ती समुद्रास मिळते त्यास तिचें मुख असें ह्मणतात.

(६) ज्या ठिकाणीं लहान नदी मोठ्या नदीस मिळते त्या ठिकाणाला संगम असें ह्मणतात.

(७) नदीचें मुख, समुद्राच्या भरतीचें पाणी आंत घेण्याजोगें रुंद असल्यास त्यास खाडी असें ह्मणतात.

(८) समुद्राचें पाणी चढतें तेव्हां त्यास भरती असें ह्मणतात, व समुद्राचें पाणी उतरतें तेव्हां त्यास ओहटी असें ह्मणतात.

# अनुक्रमणिका.


| | |
|---|---|
| भाग १. | पृष्ठ. |
| प्रकरण १ लें. साधारण माहिती. ... ... ... | १ |
| ,, ... २ रें. मुंबई इलाख्याचे विभाग. ... ... | ७ |
| ,, ... ३ रें. राज्य करण्याची रीत. ... ... | १० |
| ,, ... ४ थें. मुंबईबेट व शहर. ... ... ... | १३ |
| भाग २. | |
| सिंधप्रांत. ... ... ... ... ... ... | १५ |
| भाग ३. | |
| कच्छ. ... ... ... ... ... ... | १८ |
| भाग ४. | |
| गुजराथ. ... ... ... ... ... ... | २० |
| भाग ५. | |
| गुजराथेंतील संस्थानें. ... ... ... ... | २४ |
| भाग ६. | |
| कोंकण. ... ... ... ... ... ... | ३० |
| भाग ७. | |
| देश. ... ... ... ... ... ... | ३३ |
| भाग ८. | |
| दक्षिण महाराष्ट्रदेश. ... ... ... ... | ४० |

# मुंबई इलाख्याचें वर्णन.

## भाग १ ला.

### प्रकरण १ लें.

### साधारण माहिती.

१ हिंदुस्थान द्वीपकल्पाच्या पश्चिमभागच्या अरुंद पट्टीला मुंबई इलाखा असें ह्मणतात. हिंदुस्थानच्या पश्चिम किनाऱ्यापैकीं $\frac{2}{3}$ किनारा ह्या इलाख्यांत मोडतो. किनारा एकसारखा असून कच्छचें आखात व खंबायतचें आखात, ह्या दोन आखातांखेरीज कोठें तुटलेला नाहीं. ह्या दोन आखातांचे मध्यें काठेवाडचें द्वीपकल्प आहे. ह्या इलाख्याच्या वायव्येस, उत्तरेस आणि ईशान्येस बलुचिस्थान, पंजाब आणि रजपूतस्थानांतील संस्थानें हीं आहेत. पूर्वेस मध्य हिंदुस्थानांतील संस्थानें, मध्य प्रांत ( सेंत्रल प्राविन्सेस् ) वऱ्हाड आणि निजामाचें राज्य हीं आहेत; दक्षिणेस मद्रास इलाखा आणि म्हैसूर प्रांत आहेत; आणि पश्चिमेस अरबी समुद्र आहे. सिंध, कच्छ, गुजराथ, महाराष्ट्र आणि दक्षिणमहाराष्ट्र हे प्रांत ह्या इलाख्यांत आहेत.

२ पर्वत.—सह्याद्रि, सातपुडा आणि हाला ह्या तीन पर्वतांच्या मुख्य ओळी आहेत. सह्याद्रीची ओळ उत्तरेकडून दक्षिणेकडे गेली आहे. हिला पश्चिमघाट असें ह्मणतात. हिचे पश्चिमेकडील प्रदेशास कोंकण व पूर्वेकडील प्रदेशास देश, अशीं नांवें आहेत. ह्या ओळींतून जागजागीं ज्या जाण्यायेण्याच्या वाटा आहेत, त्यांस घाट ह्मणतात. हे घाट पुष्कळ

आहेत, पैकीं प्रसिद्ध आहेत, त्यांचीं नांवें:—थळघाट, नाशिकाजवळ आहे; २ बोरघाट, खंडाळ्याजवळ आहे; ३ पारघाट, महाबळेश्वराजवळ आहे; ४ माळशिरसचा घाट, जुनराजवळ आहे; ५ वरंध्या घाट, महाडचे रस्त्यावर आहे; ६ कुंभारलीघाट, चिपळुणाजवळ आहे; ७ आंबेघाट, कोल्हापुराहून रत्नागिरीचे रस्त्यावर आहे; ८ आंबोलीघाट, बेळगांवाहून वेंगुर्ल्याचे रस्त्यावर आहे; ९ तिनैघाट, बेळगांवाहून गोंव्याचे रस्त्यावर आहे; १० आरबैलघाट, धारवाडाहून कारवारच्या रस्त्यावर आहे; ११ देविमणीघाट, सिरसीहून कुमठ्याचे रस्त्यावर आहे; आणि १२ मलिमणी घाट, सिद्धापुराहून गेरसप्पाच्या रस्त्यावर आहे. ह्या ओळींत थळघाटाजवळचा कळसुबाई नांवाचा डोंगर फार उंच आहे; त्याची उंची ५,२५० फूट आहे. चादवडचे डोंगर, अजिंठ्याचे डोंगर, अहंमदनगरच्या उत्तरेकडील डोंगर, साताऱ्याजवळचा शंभुमहादेवाचा डोंगर, आणि कोल्हापुराजवळचा जोतीबाचा डोंगर, हे सह्याद्रीचे मुख्य फांटे आहेत. महाबळेश्वर, माथेरान, सिंहगड, पुरंदर, सप्तशृंग, अंजनेरी वगैरे उंच ठिकाणें आहेत. तेथील हवापाणी चांगलें असल्यामुळें श्रीमंतलोक तेथें उन्हाळ्यांत रहावयास जातात. सातपुड्याची ओळ नर्मदा आणि तापी ह्या दोन नद्यांच्या मधून पूर्वेकडून पश्चिमेकडे गेली आहे. हाला पर्वतांची ओळ सिंध प्रांताचे पश्चिमेस असून उत्तरेकडून दक्षिणेकडे गेली आहे. अरवली पर्वतांचें नैर्ऋत्य टोंक गुजराथचे उत्तर हद्दीस येऊन मिळालें आहे. त्यांत अबूचा पहाड हें प्रसिद्ध शिखर आहे. तेथील हवापाणी चांगलें असल्यामुळें श्रीमंतलोक तेथें उन्हाळ्यांत रहावयास जातात. अबूचे पाहाडापासून दक्षिणेस महीनदीपर्यंत एक डोंगरांची ओळ गुजरा-

थचे पूर्व हद्दीवरून गेली आहे. मही आणि नर्मदा ह्यांचे मध्यें कांहीं तुटक डोंगर आहेत, ते विंध्याद्रीचे फांटे आहेत, असें ह्मटलें तरी चालेल. नर्मदा आणि तापी ह्यांचेमध्यें राजपिंपळ्याचे डोंगर आहेत.

**३. नद्या**—१ सिंधुनद, हा तिबेटांतून निघाल्यावर काश्मीर प्रांतांत जातो व हिंदुकुश व हिमालय ह्या पर्वतांमधून पंजाबांत शिरतो. नंतर सिंध प्रांतांतून थेट दक्षिणेकडे वहात जाऊन पुष्कळ मुखांनीं अरबी समुद्रास मिळतो. ह्या नदाचे कांठीं सक्कर आणि हैदराबाद हीं मोठीं शहरें आहेत. ह्या नदाची लांबी १८०० मैल आहे व ह्याचे कालवे काढून शेतकीचे कामाकरितां लांबवर नेले आहेत. २ नर्मदा, ही मध्य प्रांतांत अमरकंटकाचे उंच प्रदेशांत उगम पावून पश्चिमेकडे ८०१ मैलपर्यंत वहात जाऊन भडोच शहराजवळ खंबायतचे आखातास मिळते. हिचे मुखापासून वर १०० मैलपर्यंत लहान लहान तारवें नेहमीं जातात. ३ तापी, ही सातपुड्यांत बैतुलाजवळ उगम पावून पश्चिमेकडे ४४१ मैलपर्यंत वहात जाऊन सुरतेजवळ खंबायतचे आखातास मिळते. हिला डावेकडून पूर्णा, गिरणा, बोरी आणि मांजरा ह्या नद्या मिळतात. गुजराथेंतील दुसऱ्या नद्यांपेक्षां ह्या नदींतून व्यापार विशेष चालतो. ४ साबरमती, ही राजपुतान्यांत उगम पावून गुजराथचे हद्दीवरील डोंगरांमधून येऊन गुजराथ प्रांताचे उत्तर भागांतून थेट दक्षिणेकडे वहात जाऊन खंबायतचे आखातास मिळते. हिचे. कांठीं अहमदाबाद शहर आहे. ५ मही, ही माळव्याचे उंच प्रदेशांत उगम पावून गुजराथचे हद्दीवरील डोंगरांमधून येऊन गुजराथप्रांताचे उत्तर भागांतून दक्षिणेकडे वहात जाऊन खंबायतचे आखातास मिळते. हिला शेढी, वात्रक आणि

मेश्वो ह्या नद्या मिळतात. ६ गोदावरी, ही सह्याद्रि पर्वतांत त्र्यंबकेश्वरापासून उगम पावून नाशिक व पैठण ह्या शहरांजवळून पूर्वेकडेस निजामाचे राज्यांतून वहात जाऊन राजमहेंद्री शहराजवळ सात मुखांनीं बंगालचे उपसागरास मिळते. हिला उजवेकडून प्रवरा व मांजरा व डावेकडून पूर्णा, प्राणहिता (पैनगंगा, वर्धा आणि वैनगंगा ह्या तीन नद्या मिळून झालेली) आणि इंद्रावती ह्या नद्या मिळतात. हिची लांबी ८९८ मैल आहे. ७ कृष्णा, ही सह्याद्रि पर्वतांत महाबळेश्वरापासून उगम पावून वाई कऱ्हाड व सांगली ह्या शहरांजवळून बेळगांव जिल्ह्याचे हद्दीपर्यंत दक्षिणेकडे वहात जाते. नंतर पूर्ववाहिनी होऊन बेळगांव व विजापूर ह्या जिल्ह्यांतून निजामाचे राज्यांत जाऊन मच्छलीपट्टणाजवळ बंगालचे उपसागरास मिळते. हिला उजवेकडून वेण्या, कोयना, वारणा, पंचगंगा, घटप्रभा, मलप्रभा आणि तुंगभद्रा व डावेकडून डोण व भीमा ह्या नद्या मिळतात ह्या नदीची लांबी ८०० मैल आहे. गोकाक शहराजवळील घटप्रभेचा धबधबा २६० फूट उंचीचा असून पहाण्यासारखा आहे. ८. शरावती, ही म्हैसूरप्रांतांत उगम पावून पश्चिमेकडे वहात जाऊन होनावर शहराजवळ अरबी समुद्रास मिळते. गेरसप्पाजवळ ही नदी मोठ्या झपाट्यानें घाटावरून खालीं पडते. त्या ठिकाणीं पुष्कळ धबधबे झाले आहेत. त्यांतील मोठा ८९० फूट उंच आहे,

४ पंजाबच्या नैर्ऋत्येपासून म्हैसूर संस्थान व मद्रास इलाखा ह्यांच्या सीमांपर्यंत, ह्या इलाख्याची लांबी १,०५० मैल आहे. ह्याचें क्षेत्रफळ २,०५,१५४ चौरसमैल आहे; पैकीं ८०,९२३ एतद्देशीय संस्थानिकांचे ताब्यांत आहे. लोकसंख्या २,५६, १५,५२८ आहे. पैकीं ९१, २०,२४३ एतद्देशीय संस्थानांत

आहे. गाइकवाड खेरीज करून एतद्देशीय संस्थानिक, मुंबई-सरकारचे ताब्यांत आहेत. त्यांतून कांहीं मुंबई सरकारास व कांहीं गाइकवाड सरकारास खंडणी देतात. संस्थानांवर देख-रेख ठेवण्याकरितां इंग्रजसरकारचे तरफेनें पोलितिकल एजन्त असतात. कधीं कधीं कांहीं संस्थानें शेजारचे ब्रितिश प्रदेशांतील कलेक्तराच्या अथवा जज्जाच्या ताब्यांतही असतात.

५ **उत्पन्न.**—सिंधप्रांतात तांदूळ, ज्वारी, बाजरी, गहूं, मूग, गळिताचीं धान्यें, सातू, कापूस आणि तंबाखू; कच्छप्रांतांत ज्वारी, बाजरी, गहूं, मूग, गळिताचीं धान्यें, कापूस, लोंकर, तुरटी आणि सोरा; गुजराथेंत तांदूळ, ज्वारी, बाजरी, गहूं, हरभरे, मका, कडदण, गळिताचीं धान्यें, कापूस, मीठ, तंबाखू, ऊंस आणि सुंठ; देशांत तांदूळ, ज्वारी, बाजरी, गहूं, कडदण, कापूस, तंबाखू, ऊंस, भुईमूग आणि मिरची; कोंकणांत तांदूळ, नागली, वरी, सांवे, हरीक, कडदण. उडीद, तीळ, मीठ, नारळ, सुपारी, आलें, केळीं व ऊंस; दक्षिणमहाराष्ट्रांत तांदूळ, ज्वारी, बाजरी, गहूं, हरभरे, कापूस, कडदण, गळिताचीं धान्यें, तंबाखू व ऊंस; आणि उत्तरकानड्यांत तांदूळ, नागली, ऊंस, नारळ, सुपारी, वेलदोडे, मिरीं आणि मीठ हीं मुख्य पिकें आहेत.

६ **आगगाडीचे रस्ते.**—१ ला.–दि ग्रेत इंदियन पेनिनसुला रेलवे, हा मुंबईत बोरीबंदराजवळून निघून कल्याणापर्यंत गेल्यावर त्याचे दोन फांटे झाले आहेत. एक थळघाटांतून नाशिक, जबलपूर, अलाहाबाद व कलकत्ता इकडे जातो; ह्या रस्त्याची एक शाखा भुसावळपासून नागपूरपर्यंत गेली आहे. दुसरा बोरघाटांतून पुणें, सोलापूर, रायचूर व मद्रास इकडे जातो. २ रा.–दि बडोदा आणि सेंत्रल इंदिया रेलवे, हा

मुंबईंत कुलाब्याजवळून निघून सुरत, बडोदें, अहमदाबाद, यांवरून वढवाणपर्यंत गेला आहे. या दोन्ही रस्त्यांना व्यापाराचे सोयीकरितां जागजागीं लहान लहान फांटे फोडले आहेत. ३ रा.–दि सिंध रेलवे, हा कराचीपासून निघून कोत्री, रक, सक्कर ह्या शहरांवरून मुलतानाकडे गेला आहे. ह्या रस्त्याची एक शाखा रकपासून शिकारपूर व जाकोबाबाद ह्या शहरांवरून सिबीपर्यंत गेली आहे व तेथून कंदाहारपर्यंत जावयाची आहे. ४ था.–दि दौंड मनमाड स्तेत रेलवे, हा अहंमदनगराजवळून जाऊन मद्रास व कलकत्ता इकडे जाणाऱ्या रस्त्यांस जोडतो. ५ वा.–दि राजपुताना स्तेत रेलवे, हा अहमदाबादपासून अजमीरकडे गेला आहे. ६ वा.–दि भावनगर आणि गोंडाल स्तेत रेलवे, हा वढवाणपासून भावनगरपर्यंत गेला आहे व त्याचा एक फांटा पश्चिमेकडे धोराजीपर्यंत नेला आहे. ७ वा.–दि सदर्न मराठा रेलवे, ह्याचे सौथदेकन, ईस्तदेकन आणि वेस्तदेकन असे तीन भाग आहेत. १ ला, मद्रासरेलवेच्या गुंडकलस्टेशनापासून निघून बेलारी, गद्दग, हुबळी, धारवाड आणि लोंढा ह्या गांवांवरून गोंव्याचे हद्दीपर्यंत जातो. ह्या रस्त्याची एक शाखा हुबळीपासून हांवेरी, राणिबेनूर ह्या गांवांवरून हरीहरपर्यंत गेली आहे. २ रा.–ग्रे. इं. पे. रे. च्या हुडगीस्टेशनापासून निघून विजापूर, व बागलकोट ह्या गांवांवरून गदगपर्यंत जातो. ३ रा.–पुण्यापासून निघून सातारा, मिरज, व बेळगांव ह्या गांवांवरून लोंढ्यापर्यंत जातो. ८ वा.–दि वेस्त आफ् इंडिया पोर्तुगीज रेलवे, हा मार्मगांवपासून निघून क्यासलराकजवळ सौथदेकनरेलवेस मिळतो.

**७ पाहाण्यासारखीं स्थळें.**— मुंबईजवळ घारापुरी, पुणेंजिल्ह्यांत जुन्नर व कार्लें, विजापूरजिल्ह्यांत बदामी, आणि

नाशिकयेथील कोरींव लेणीं पहाण्यासारखीं आहेत. ठाणेंजिल्ह्यांत वज्राबाई ह्मणून एक देवीचें स्थान आहे, तेथें पुष्कळ उन्हाळीं ( ऊन पाण्याचे झरे ) आहेत. खानदेशांत ऊनावद व रत्नागिरीजिल्ह्यांत राजापूर येथेंही ऊन पाण्याचे झरे आहेत. राजापूरपासून एक कोसावर गंगास्थान आहे तेथें वर्ष दोन वर्षांनीं एकाएकीं पाण्याचा लोट मोठ्या झपाट्यानें येऊन गायमुखांतून वाहूं लागतो तेव्हां लोक गंगा आली असें समजून यात्रेस जातात. द्वारका, सोमनाथ, डाकूर, पाळिटार्णा, त्र्यंबकेश्वर, पंढरपूर, कोल्हापूर आणि गोकर्ण हीं प्रसिद्ध देवस्थानें आहेत.

---

## प्रकरण २ रें.

## मुंबई इलाख्याचे विभाग.

१ उत्तरेकडून निघालों असतां, खालीं लिहिल्याप्रमाणें ह्या इलाख्याचे पांच विभाग आहेत. १ सिंध, २ कच्छ, ३ गुजराथ, ४ महाराष्ट्र ( कोंकण व देश मिळून ) आणि ५ दक्षिणमहाराष्ट्र.

मुंबई शहर हें इलाख्याची राजधानी आहे. मुंबईबेट हें इंग्लंदचा राजा दुसरा चार्लस ह्यास सन १६६१ त पोर्तुगाल देशचे राजानें आंदण दिलें. अद्यापि पोर्तुगीज लोकांचे ताब्यांत दक्षिणेस गोंवें प्रांत (क्षेत्रफळ २२४ चौरसमैल), सुरतेच्या दक्षिणेस दमण ( क्षेत्रफळ २२ चौरसमैल ), आणि काठेवाडचे दक्षिणेस दीव नांवाचें लहानसें बेट हीं आहेत.

गुजराथेंतील ब्रितिश सरकारचे ताब्यांतला मुलूख, हा गाइकवाडापासून तहाचे हक्कानें बहुतेक मिळाला. महाराष्ट्र व दक्षिणमहाराष्ट्र हे प्रांत पेशव्यांपासून सन १८१८ त जिंकून घेतले. सन १८६१ त उत्तरकानडा मद्रास इलाख्यापैकीं

मिळाला. आणि सन १८४३ त सर चार्लस नेपियर ह्यानें सिंधप्रांत अमीर नांवाच्या राजापासून जिंकून घेतला.

ह्या पांच विभागांतील जिल्हे, संस्थानें, पोलिटिकल एजन्स्या व त्यांतील *क्षेत्रफळ, लोकसंख्या व मुख्य शहरें खालीं लिहिल्याप्रमाणें आहेत.

## १ सिंध.

| जिल्हा अथवा संस्थान | क्षेत्रफळ. चो. मैल. | लोकसंख्या. | मुख्य शहरें. |
|---|---|---|---|
| १ अपरसिंधफ्रंतियर. | २१३९. | १२४१८१. | जाकोबाबाद. |
| २ शिकारपूरजिल्हा. | १०००१. | ८५२९८६. | शिकारपूर, |
| ३ हैदराबादजिल्हा. | ९०३०. | ७५४६२४ | हैदराबाद. |
| ४ कराचीजिल्हा. | १४११५. | ४७८६८८. | कराची. |
| ५ थर आणि पारकर. | १२७२९. | २०३३४४. | उमरकोट. |
| ६ खैरपूरसंस्थान. | ६१०९. | १२९१५३. | खैरपूर. |

## २ कच्छ.

| | | | |
|---|---|---|---|
| १ कच्छ (रणखेरीज). | ६५००. | ५१२०८४. | भूज. |

## ३ गुजराथ.

| | | | |
|---|---|---|---|
| १ अहमदाबादजिल्हा. | ३८२१. | ८५६३२४. | अहमदाबाद. |
| २ खेडाजिल्हा. | १६०९. | ८०४८००. | खेडा. |
| ३ पंचमहालजिल्हा. | १६१३. | २५५४७५. | गोध्रा. आणि दोहद. |
| ४ भडोचजिल्हा. | १४५३ | ३२६९३०. | भडोच. |
| ५ सुरतजिल्हा. | १६६२. | ६१४१९८. | सुरत. |
| ६ पालनपूरएजन्सी. | ८०००. | ५७६४७८. | डीसा व पालनपूर. |
| ७ काठेवाडएजन्सी. | १९२५६. | २३४३८९९. | राजकोट. |
| ८ महीकांठाएजन्सी. | ११०४८. | ५१७४८५. | सादा व ईदर. |
| ९ रेवाकांठाएजन्सी. | ४७९२. | ५४३४५२. | नादोद. |

* ह्या पुस्तकांत दिलेलीं क्षेत्रफळें व लोकसंख्या मुलांकडून पाठ करवूं नये.

| | | | |
|---|---|---|---|
| १० गाइकवाडचें राज्य. | ८५७०. | २१८५००५. | बडोदें. |
| ११ खंबायतसंस्थान. | ३५०. | ८६०७४. | खंबायत. |
| १२ पंचमहालएजन्सी; | १३३. | ६४४०. | नारुकोट. |
| १३ सुरतएजन्सी. | १२२०. | १५११३२. | वासदा, धरमपूर, सचीन. |

## ४ महाराष्ट्र ( मुंबईबेट खेरीजकरून. )

| | | | |
|---|---|---|---|
| **कोंकण.** | | | |
| १ ठाणेंजिल्हा. | ४२४३. | ९०८५४८. | ठाणें. |
| २ जव्हारसंस्थान. | ५३४. | ४८५५६. | जव्हार. |
| ३ कुलाबाजिल्हा. | १४९६. | ३८१६४९. | अलिबाग. |
| ४ जंजिरें संस्थान. | ३२४. | ७६३६१. | जंजिरें. |
| ५ रत्नागिरीजिल्हा. | ३९२२. | ९९७०९०. | रत्नागिरी. |
| ६ सांवतवाडीसंस्थान. | ९००. | १७४४३३. | सांवतवाडी. |
| **देश.** | | | |
| १ खानदेशजिल्हा. | ९९४४. | १२३७२३१. | धुळें. |
| २ खानदेशएजन्सी. | ३८४०. | ६०२७०. | |
| ३ नाशिकजिल्हा. | ५९४०. | ७८१२०६. | नाशिक. |
| ४ अहंमदनगरजिल्हा. | ६६६६. | ७५१२२८. | अहंमदनगर. |
| ५ पुणेंजिल्हा. | ५३४८. | ९००६२१. | पुणें. |
| ६ भोरसंस्थान. | १४९१. | १४५८७६. | भोर. |
| ७ साताराजिल्हा. | ४९८८. | १०६२३५०. | सातारा. |
| ८ साताराएजन्सी. | ८४४. | ११७३१८. | औंध, फलटण. |
| ९ सोलापूरजिल्हा. | ४५२१. | ५८२४८७. | सोलापूर. |
| १० अक्कलकोटसंस्थान. | ४९८. | ५८०४०. | अक्कलकोट. |

## ५ दक्षिणमहाराष्ट्रदेश.

| | | | |
|---|---|---|---|
| १ विजापूरजिल्हा. | ५७५७. | ६३८४९३. | विजापूर. |
| २ जतसंस्थान. | ८८४. | ४९४८६. | जत. |
| ३ बेळगांवजिल्हा. | ४६६७. | ८६४०१४. | बेळगांव. |
| ४ कोल्हापूरसंस्थान. | २८१६. | ८००१८०. | कोल्हापूर. |
| ५ दक्षिणमहाराष्ट्र जहागिरी. | २७३४. | ५२३७५३. | सांगली, जमखिंडी, मिरज, कुरुंदवाड, मुधोळ, रामदुर्ग. |

| | | | |
|---|---|---|---|
| ६ धारवाडजिल्हा. | ४५३५. | ८८२९०७. | धारवाड. |
| ७ सावनूरसंस्थान. | ७०. | १४७६८. | सावनूर. |
| ८ उत्तरकानडाजिल्हा. | ३९११. | ४२१८४०. | कारवार. |

## प्रकरण. ३ रें.

### राज्य करण्याची रीत.

१ हा इलाखा येथील गवर्नर इन्कौन्सिल ह्यांच्या ताब्यांत आहे. ह्यांच्या हाताखालीं सिंधप्रातांत एक कमिशनर आहे, आणि गुजराथ, महाराष्ट्र, दक्षिणमहाराष्ट्र व उत्तरकानडा ह्यांतील १८ जिल्ह्यांचे उत्तर भाग, मध्य भाग आणि दक्षिण भाग असे तीन विभाग करून ते कमिशनरांचे ताब्यांत दिले आहेत. उत्तर भागांत अहमदाबाद, खेडा, पंचमहाल, भडोच, सुरत, आणि ठाणें; मध्य भागांत नाशिक. खानदेश, अहंमदनगर, पुणें, सोलापूर आणि सातारा; व दक्षिण भागांत कुलाबा, रत्नागिरी, विजापूर, बेळगांव, धारवाड आणि उत्तरकानडा हे जिल्हे आहेत. एतद्देशीय संस्थानांवर देखरेख करण्याकरितां पोलितिकल एजंत असतात.

२ **जिल्हे.**—प्रत्येक जिल्ह्यावर एक कलेक्तर व दिस्त्रिक्त माजिस्त्रेत असतो; तो सरकारी महसूल वसूल करितो व सरकारतर्फें खर्चाची व्यवस्था करितो. तो मुलकी व फौजदारी काम पाहतो व सर्व लोकोपयोगी कामांकडेसही लक्ष देतो. बहुधा त्याच्या हाताखालीं दोन असिस्तंत कलेक्तर, एक दिस्त्रिक्त देप्युती कलेक्तर व एक हुजूर देप्युती कलेक्तर असे असतात. असिस्तंत कलेक्तर आणि दिस्त्रिक्त डेप्युती कलेक्तर ह्यांचे ताब्यांत एक किंवा अधिक तालुक्यांचें काम सोंपविलें असतें. हुजूर देप्युती कलेक्तर जिल्ह्याचे मुख्य गांवीं राहून खजिना वगैरेचीं कामें पाहातो. हे सर्व कामगार माजिस्त्रेती

सं. ग्रं. मुंबई



कामही पाहतात. शिवाय पोलिस सुपरिन्तेंदेन्त, एक्झिक्युतिव एंजीनियर व मोजणी व पाहणी करणारे कामगार, कलेक्तरास मदत करितात.

पोलिस सुपरिंतेंदेन्त व त्याचे हाताखालचे कामगार, हे चोर व दरोडेखोर ह्यांस पकडून माजिस्त्रेताकडे इनसाफाकरितां पाठवितात. एंजिनियर, रस्ते, सरकारी इमारती, तलाव, धर्मशाळा वगैरे लोकोपयोगी कामें करितो. पाहणी व मोजणी करणारे कामगार, जमिनींची मोजणी करून व त्यांच्या प्रती लावून प्रत्येक शेतकऱ्यानें सरकारास सारा किती द्यावा हें ठरवितात.

जिल्ह्याचे पोटविभाग, तालुके किंवा परगणे व तालुक्याचे पोटविभाग पेटे आहेत. प्रत्येक तालुक्यांत कलेक्तराचें काम मामलेदार करितो. तालुका मोठा असल्यास त्यांतील कांहीं भाग महालकऱ्याचे ताब्यांत असतो व तो मामलेदाराचे हाताखालीं काम करितो. पोलिस सुपरिंतेंदेन्तचें काम तालुक्यांत फौजदार ( चीफकान्स्तेबल ) करितो.

३ बहुतकरून प्रत्येक जिल्ह्यांत एक जज्ज असतो, तो माजिस्त्रेतांनीं पाठविलेल्या मोठमोठ्या फौजदारी खटल्यांची चौकशी करितो. स्थावर व जंगम मिळकत व देणें घेणें ह्यांसंबंधी खटल्यांची चौकशी तोच करितो. जज्जाचे हाताखालीं असिस्तंत जज्ज व सबार्दिनेत जज्ज असतात. दिवाणी मुकदम्यांच्या निकालाकरितां मोठमोठाल्या ठिकाणीं सबार्दिनेत जज्ज कोर्तें असतात. मोठमोठ्या शहरांत स्मालकाज ( लहान दाव्याचे ) जज्ज असतात. ते थोड्या कर्जाचे दावे लवकर तोडतात.

प्रत्येक जिल्ह्यांत एक पोस्तमास्तर असतो, व टपाल कचेरी चालण्यासारख्या कसब्यांत व खेड्यांत देप्युती पोस्तमास्तर या

नांवाचे कारकून असतात. त्यांचें काम सरकारी व खासगी लखोटे ज्यांचे त्यांस पोंचते करविणें, हें आहे. ह्यांचे कामाची देखरेख करण्यारितां इन्स्पेक्तिग पोस्तमास्तर ह्या नांवाचे अधिकारी असतात व सर्व इलाख्यावर पोस्तमास्तर जनरल ह्या नांवाचा मुख्य अधिकारी असतो.

प्रत्येक जिल्ह्याचे ठिकाणीं एक सिविल सरजन असतो, तो आजारी लोकांस औषध देतो, आणि एखादा मनुष्य फारच आजारी असेल तर त्यास इस्पितलांत ठेवून औषधपाण्याची तजवीज करितो. ह्याच कामाकरितां जिल्ह्यांतील मोठमोठ्या गांवीं दिस्पेन्सऱ्या ( दवाखाने ) स्थापन केल्या आहेत.

४ इलाख्यांतील सर्व लोकांस विद्या प्राप्त व्हावी ह्मणून सरकारानें विद्याखातें स्थापन केलें आहे. त्याचे देखरेखीकरितां दैरेक्तर आफ् पब्लिक इन्स्त्रक्शन नांवाचा मुख्य अधिकारी असतो व त्याचे हाताखालीं एज्युकेशनल इन्स्पेक्टर व डेप्युटी एज्युकेशनल इन्स्पेक्टर नांवाचे अधिकारी असतात. जेथें तीस अथवा जास्ती मुलें शिकणारीं असतात अशा सर्व ठिकाणीं शाळा स्थापन झाल्या आहेत. .

इलाख्यांतील जंगलांची व्यवस्था नीट व्हावी ह्मणून सिंधप्रांतांत एक व बाकीचे प्रांताचे उत्तर व दक्षिण असे दोन भाग करून त्यांवर एक एक असे अधिकारी नेमिले आहेत. त्यांस कान्सरवेटर आफ् फारेस्ट असें ह्मणतात. त्यांचे हाताखालीं प्रत्येक जिल्ह्यास एक एक कामगार असतो. त्यास डेप्युटी किंवा असिस्टन कान्सरवेटर आफ् फारेस्ट असें ह्मणतात.

इलाख्यांतील सर्व ठिकाणीं आरोग्यरक्षणाची व्यवस्था बरोबर आहे किंवा नाहीं हें पाहण्याकरितां एक अधिकारी नेमिला असतो, त्यास सानेटरी कमिशनर असें ह्मणतात. तो सर्व इला-

त्यांत फिरून रोगराई होण्याचीं कारणें शोधून काढून त्यांचे निवारणार्थ काय तजविज़ी कराव्या हें सरकारास सुचवितो. देवी काढण्याचे खात्याची देखरेखही त्याजकडेसच असते.

५ पोलिटिकल एजन्त आपले ताब्यांतील संस्थानांवर देखरेख ठेवितो. त्याला एक दोन किंवा अधिक मदतगार असतात. संस्थानिकांतील तंटे तोडणें, त्यांपासून खंडणी वसूल करणें, व त्यांना चांगली मसलत देणें हीं त्याचीं मुख्य कामें आहेत. खंडणीपैकीं गाइकवाड किंवा दुसरे संस्थानिक यांचा जो भाग असेल तो, त्यांकडे पाठवितो. एखादा राजा मरण पावल्यावर त्याचा वारस अल्पवयी असेल तर, पोलिटिकल एजन्त त्याच्या इस्तेतीची वगैरे वहिवाट करितो. कांहीं एजन्स्यांत हे कामदार, मुख्य मुख्य राजे व दुसरे हुशार गृहस्थ मिळून खून, दरोडे वगैरे मोठमोठ्या गुन्ह्यांची चौकशी करितात.

---

## प्रकरण ४ थें.

## मुंबईबेट व शहर.

मुंबईबेट हा एक निराळाच भाग आहे, व तो वर सांगितलेल्या भागांत येत नाहीं. हें बेट सपाट असून त्याच्या दोहों-बाजूंस लहान लहान टेंकड्या आहेत. ह्याची लांबी ११ मैल व रुंदी ३ मैल आहे. ह्या बेटाचे पूर्वेस हें बेट व कोंकण-किनारा, ह्यांचेमध्यें पांचपासून सात मैल रुंदीचा जो पाण्याचा भाग आहे त्यास मुंबई बंदर असें ह्मणतात. ह्या बंदराच्या पश्चिमेस मुंबईबेट असल्यामुळें तें समुद्राच्या व वाऱ्याच्या झपाट्यापासून सुरक्षित आहे. पृथ्वीमध्यें जीं अतिशय मोठीं बंदरें आहेत त्यांपैकीं हें एक आहे, व हें मोठमोठ्या तारवांनीं व आगबोटींनीं, नेहमीं भरलेलें असतें. ह्या बंदरांत पुष्कळ बेटें

आहेत त्यांपैकीं फार प्रसिद्ध ह्मटलें ह्मणंजे, घारापुरी आहे. तेथील कोरींवलेणीं पाहण्यासारखीं आहेत. ह्या बेटाचे पूर्व- बाजूस किल्ला होता, परंतु थोड्या वर्षांपूर्वी त्याचा तट सरका- रानें पाडून टाकिला; तरी तटाच्या आंतील प्रदेशास अद्यापि कोट ( किल्ला )च ह्मणतात. तेथें व्यापारी व हुंडीवाले ह्यांच्या पेढ्या आहेत; व मुलकी, न्याय, विद्या, टपाल, तारायंत्र वगैरे खात्यांच्या सोयीकरितां, सरकारानें मोठमोठ्या इमारती बां- धिल्या आहेत.

मुंबई बेटाची लोकसंख्या ७,७३,१९६ आहे. लंदन शि- वाय करून ब्रिटिशराज्यांत मुंबई हें अतिशय मोठें शहर आहे. येथील लोक मुख्यत्वेंकरून मराठी, गुजराथी व हिंदुस्थानी भाषा बोलतात. पृथ्वीवरील सर्व भागांतून व्यापाराकरितां आलेले लोक, इंग्रजी व दुसऱ्या पुष्कळ भाषा बोलतात. मुं- बईपासून कलकत्ता १३०१ मैल व मद्रास ७९३ मैल दूर आहे.

ह्या बेटाची बहुतेक जमीन समुद्रांतून घेतली आहे. आणि उत्तरेकडील भाग, ठाणें जिल्ह्यांतील साष्टी व वांद्रें ह्या बेटांस पुलांनीं जोडला आहे. साष्टीबेटांत सरकारानें मोठा तलाव बांधिला आहे त्यास विहाडचा तलाव असें ह्मणतात. मुंबई तेथून सुमारें १६ मैल असून त्या तलावांतील पाणी लोखंडी नळानें तिकडे नेलें आहे. ह्या तलावाचें पाणी पुरत नाहीं ह्मणून तुळसी तलाव बांधला व तान्सा तलाव बांधण्याचें काम सुरू आहे.

रंग देणें, कातडीं कमावणें व धातूचें काम करणें, हीं कामें ह्या बेटांतील व्यापाराच्या कामांपैकींच आहेत; परंतु ताग आणि कापूस ह्यांचें सूत काढून त्याचें कापड विणणें हें मुख्य व्यापा-

राचें काम आहे. हल्लीं सूत काढण्याचीं व कापड विणण्याचीं वाफेचीं यंत्रें ( गिरण्या ) पुष्कळ आहेत, व त्यांत हजारों मनुष्यें काम करितात. नारळीचीं झाडें लावणें व दारू तयार करणें हींही फायद्याचींच कामें आहेत.

मुंबईस म्युनिसिपालिटी आहे. परंतु सरकारतर्फे जमिनीचा सारा, आणि स्तांपाचें उत्पन्न ह्यांचें काम पाहण्याकरितां कलेक्तर आहे; आणि मीठ, अफू, दारू व जहाजांवरील जकात घेण्याकरितां एक कमिशनर आहे.

मुंबईस युरोपाहून येणाऱ्या तारवांच्या व आगबोटींच्या संरक्षणाकरितां अरबस्थानाच्या नैर्ऋत्य कोणास आदन (एदन) येथें ब्रितिशसरकारचें ठाणें आहे. ह्याचें क्षेत्रफळ ११$\frac{3}{5}$ चौरस मैल व लोकसंख्या ३४,८६० आहे. तेथील हवा उष्ण आहे, व तेथें पाऊसही कमी पडतो. आदनापासून थोड्या मैलांवर तांबड्या समुद्रांत पेरिम नांवाचें बेट आहे तें मुंबई सरकारच्या ताब्यांत आहे.

---

## भाग २ रा.

### सिंध प्रांत.

मुंबई इलाख्यापैकीं हा अगदीं उत्तरेकडचा प्रांत आहे. ह्याचे उत्तरेस पंजाब व बलुचिस्तान; पूर्वेस जेसलमीरचें मैदान व राजपुतान्यांतील संस्थानें; दक्षिणेस कच्छचें रण व अरबी समुद्र आणि पश्चिमेस हाला आणि सुलेमान पर्वत हीं आहेत.

ह्या प्रांताचें क्षेत्रफळ ५४,१२३ चौरसमैल व लोकसंख्या २५,४२,९७६ आहे. पैकीं $\frac{3}{4}$ मुसलमान आहेत. ह्या प्रांतांत बहुतकरून सिंधी व बलुची भाषा बोलतात. ह्या प्रांताचे मध्यभागीं सिंधुनद असून त्याचे कांठचा प्रदेश सपाट आहे;

व त्यांतील जमीन सुपीक असून लागवडही चांगली होते. पाऊस ह्मटला तर अगदीं थोडा पडतो, परंतु मार्च महिन्यापासून सप्तम्बर महिन्यापर्यंत सिंधूचें पाणी वाढत असतें. ह्यामुळें मध्यभागचे सपाट प्रदेशांत पूर येतात. शिवाय ह्या नदीचे कालवे काढून दूरवर नेले आहेत. ह्या प्रांताचा पश्चिमेकडचा प्रदेश डोंगराळ असून तेथें पुष्कळ धनगर लोक रहातात; व दक्षिणेकडचा प्रदेश क्षारयुक्त असून रोगकारक आहे. ह्याचे पूर्वेस मोठें मैदान असून त्यांत पुष्कळ वाळूच्या टेंकड्या आहेत. सिंध हा, शेतकीचा व चराईचा मुलुख आहे, तरी तेथें मातीचीं भांडीं, कातड्याचें काम व गालीचे हे चांगले तयार होतात. आगबोटी, सिंधुनदांतून वर मुलतानपर्यंत जातात.

हा प्रांत कमिशनराचे ताब्यांत आहे व ह्याचे पांच भाग आहेत; पैकीं मधले तीन फार सुपीक आहेत, त्यांस जिल्हे ह्मणतात. त्यांचीं नांवें. शिकारपूर, हैदराबाद आणि कराची. बाकीचे दोन, पोलितिकल सुपरिंतेंदेन्तांच्या ताब्यांत आहेत. ह्यांशिवाय खैरपूर हें एक मुसलमानी संस्थान आहे.

**१ अपरसिंधफ्रंतियर.**—( सिंधचे वरचे हद्दीवरचा प्रदेश ) हा अगदीं उत्तरेकडचा भाग आहे. ह्याचे तीन तालुके आहेत. हा प्रदेश बहुतकरून सपाट आहे. उत्तरेकडची जमीन ओसाड आहे, परंतु इतर ठिकाणीं पाणी दिलें तर जमीन सुपीक आहे. ह्यांत जाकोबाबाद हें बरेंच मोठें शहर आहे. येथें लष्करी छावणी असते व एकंदर लोकसंख्या ११,३५२ आहे.

**२ शिकारपूर**—हा जिल्हा अपरसिंधफ्रंतियरचे दक्षिणेस आहे. ह्याचे १७ तालुके आहेत. ह्यांतील जमीन सपाट

असून त्यांत पूर येतात. जाडें भरडें कापड, हस्तिदंती खेळ व मातीचीं भांडीं हे व्यापाराचे जिन्नस ह्यांत तयार होतात.

व्यापाराकरितां प्रसिद्ध अशीं दोन शहरें आहेत. शिकारपूर, लोकसंख्या ४२,४९६ आणि सक्कर, लोकसंख्या २७,३८९ पहिल्यांत खोरासानचे घाटानें व दुसऱ्यांत बोलन घाटानें पश्चिमेकडील देशांतून व्यापाराकरितां जिन्नस येतात. लारखाना, लोकसंख्या १३,१८८, आणि रोरी लोकसंख्या १०,२२४ हींही बरींच मोठीं शहरें आहेत.

**३ कराची जिल्हा**—हा शिकारपूर जिल्ह्याचे दक्षिणेस आहे व ह्यांत १३ तालुके आहेत. ह्या जिल्ह्याचे तीन भाग आहेत; १ पश्चिमेकडील डोंगराळ व ओसाड प्रदेश, ह्यांत पाऊस क्वचित् पडतो. २ मध्यभागीं सिंधूचे कांठचा सुपीक प्रदेश. ३ दक्षिणेकडील नवीन झालेला त्रिकोणाकृति दलदलीचा प्रदेश, हा रोगट आहे.

कापसाचें कापड, मातीचीं भांडीं व काथ्याचीं तरटें हे व्यापाराचे जिन्नस येथें तयार होतात.

मुख्य शहर कराची येथें लष्करी छावणी असते व एकंदर लोकसंख्या ७३,५६० आहे. हें ह्या इलाख्यांत पांचवें मोठें शहर आहे. कराचीचें बंदर प्रसिद्ध आहे, व तेथें गलबतांना चांगला आश्रय मिळतो. टठ्ठा, लोकसंख्या ८,८३० आणि कोत्री, लोकसंख्या ८,९२२ हींही बरींच मोठीं शहरें आहेत.

**४ हैदराबाद जिल्हा.**—हा कराची जिल्हा व कच्छचें रण ह्यांचे उत्तरेस असून सिंधुनदाचे पूर्वेस आहे, व ह्यांत १३ तालुके आहेत. ह्यांतील जमीन मैदान असून त्यांत कालवे पुष्कळ आहेत. ह्यांत मोठमोठीं अरण्यें आहेत, व पुष्कळ प्रदेश ओसाड आहे, परंतु त्यांत मीठ सांपडतें.

सिंधप्रांतांत व्यापाराची मुख्य जागा, हैदराबाद येथील गालीचे, कापसाचें व रेशमाचें कापड, मातीचीं भांडीं व कातड्याचें काम हीं सर्व जगप्रसिद्ध आहेत. येथील लोकसंख्या ४८,१५३ आहे. हैदराबाद ही सिंधचे अमिराची राजधानी होती; हैदराबादेजवळ मियानी येथें सर चार्लस नेपियर ह्यानें सिंधचे अमिराचा पराजय केला.

**५ थर आणि पारकर.**—हा भाग, हैदराबाद जिल्ह्याचे पूर्वेस आहे व ह्यांत ७ तालुके आहेत. ह्याचे तीन भाग आहेत. १ पश्चिमेस पूर्व किनाऱ्याचें मैदान, ह्यांत कालवे पुष्कल आहेत. २ मध्यभागीं थरचें अरण्य, हें मोठें असून त्यांत जागजागीं वाळूचीं टेंकाडें आहेत. ३ आग्नेयेस पारकर, हें कच्छचे रणांत बेटासारखें दिसतें. पाऊस क्वचित् पडतो. थरचें अरण्य आणि पारकर ह्यांत पाणी दुर्मिळ आहे, बनाती, गालीचे आणि कातड्याचें काम हे व्यापाराचे जिन्नस येथें तयार होतात. ह्यांत उमरकोट, हा बराच मोठा गांव आहे.

**६ खैरपूरसंस्थान.**—हें थर आणि पारकर ह्यांचे उत्तरेस असून मिरअल्ली मुराद ह्याचे ताब्यांत आहे.

---

## भाग २ रा.

### कच्छ.

हा प्रांत सिंधप्रांताचे आग्नेयेस आहे. ह्याचे उत्तरेस, पूर्वेस आणि आग्नेयेस रण, दक्षिणेस आणि नैर्ऋत्येस कच्छचें आखात व अरबी समुद्र, आणि वायव्येस कोरी नदी ( सिंधूचा पूर्व फांटा ). रण हें एक विस्तीर्ण रेतीचें मैदान आहे. तें पावसाळ्यांत पाण्यानें आच्छादलेलें असतें त्या वेळीं कच्छ हें एक बेट आहे असें दिसतें.

**पर्वत.**— दक्षिणबाजू खेरीजकरून ह्या प्रांताचे सभोंवतीं, डोंगरांच्या ओळी आहेत. दक्षिणेकडील प्रदेश अगदीं सपाट असून जमीन फार सुपीक आहे. मुख्य ओळी तीन आहेत व त्या पूर्वपश्चिम गेल्या आहेत. १ उत्तरधार, ही पश्चिमेकडून पूर्वेकडे रणांतून चोरवाड्याकडे गेली आहे. हिचें काळोनामक शिखर सर्वांत अधिक उंच आहे. १ मध्यधार, ही कच्छचे उत्तरेस कच्छ आणि रण ह्यांचे मध्यें आहे. हिचें धिणोधर नांवाचें शिखर १,२६८ फूट उंच आहे. ३ चाडवा, ही भूजचे दक्षिणेस पूर्वपश्चिम गेली आहे. हिचें ननामो नांवाचें शिखर १,४२४ फूट उंच आहे.

**नद्या.**—ह्या प्रांतांत सांगण्यासारख्या मोठ्या नद्या नाहींत, तरी नागमती, रुक्मावती, आणि खारी ह्या तीन नद्यांस बारमाही पाणी असतें.

हें संस्थान एका रजपूत राजाच्या ताब्यांत आहे, त्यास कच्छचे राव असें ह्मणतात. रावाचे नातेवाईक पुष्कळ आहेत हें त्यांचे ताब्यांत संस्थानाचा बराच भाग तोडून दिलेला आहे. ते बहुतकरून स्वतंत्रपणानें वागतात. ह्या संस्थानची राजधानी भूज, हें शहर, राव श्रीखेंगारजी ह्यांनीं संवत् १६०५ ह्या वर्षीं बांधिलें. ह्या शहरची लोकसंख्या २२,३०८ आहे. मांडवी व ह्या संस्थानांत मोठें बंदर आहे. येथील वस्ती ३५,९८० आहे व येथें व्यापारही बराच चालतो. गलबतांच्या सोयीकरितां येथें एक दीपगृह बांधिलें आहे. मंदरा, लाखपत, जखावु आणि तुणा हीं बरींच मोठीं बंदरें आहेत. सुमरीरोह, भद्रेश्वर, केरा आणि कंथकोट हीं शहरें फार प्राचीनकाळचीं असून येथें जैनधर्माचीं देवालयें आहेत. शिवाय अंजर, रापर, बचौ, बेला, नलिया, कोथारा, आणि तेरा हीं बरींच मोठीं शहरें आहेत.

ह्या संस्थानांत लहान मोठे ८७८ गांव आहेत, व कामाचे सोयीकरितां ह्याचे १६ परगणे केले आहेत. दिवाणी व फौजदारीसंबंधीं सर्व कामें व महसुलासंबंधीं सर्व कामें ब्रिटिश मुलुखांतील पद्धतीप्रमाणेंच चालतात. भूज आणि मांडवी ह्या दोन ठिकाणीं धर्मार्थ दवाखाने आहेत.

इंग्रज सरकारतर्फे पोलिटिकल एजंत भूज येथें असतो व तेथें इंग्रज सरकारची थोडीशी फौजही असते.

जरीचे कामाविषयीं या संस्थानाची आख्या आहे व येथें कापसाचीं व रेशमीं वस्त्रें चांगलीं होतात. ह्या संस्थानांत थोडा सोराही तयार करितात. कोळशाच्या खाणी ह्या संस्थानांत आहेत; परंतु त्यांतून कोळसे काढीत नाहींत. तूप, तेल, धान्य, घोडे, ह्मशी, गाई, बैल आणि उंटें हीं येथून परमुलखांत रवाना होतात.

---

## भाग ४ था.

### गुजराथ.

ह्या प्रांताचे उत्तरेस राजपुताना; पश्चिमेस कच्छचें आखात व रण आणि अरबी समुद्र; दक्षिणेस कोंकण आणि पूर्वेस राजपुताना, मध्यहिंदुस्थानांतील संस्थानें व खानदेश आणि नाशिक जिल्हे हीं आहेत. ह्या प्रांताचे काठेवाड आणि खुद्द गुजराथ असे दोन भाग आहेत. काठेवाड हें एक द्वीपकल्प असून तें कच्छचें आखात व खंबायतचें आखात ह्यांच्या मध्यें आहे. उत्तरेकडील भाग खेरीजकरून, खुद्द गुजराथेंतील जमीन मळईची असून सपाट आहे व तींत उत्तम प्रकारचें पीक होतें.

ह्या प्रांतांतल्या इंग्रज सरकारच्या मुलखाचे पांच भाग आहेत. उत्तरेकडून प्रारंभ केला असतां त्यांचीं नांवें अहमदाबाद, खेडा, पंचमहाल, भडोच आणि सुरत हीं आहेत.

**१ अहमदाबाद जिल्हा.**—गुजराथ प्रांतांतला हा अगदीं उत्तरेकडचा जिल्हा आहे, व ह्यांत ७ तालुके आहेत त्यांचीं नांवें.-प्रांतीज, विरमगांव, धोल्का, दसक्रोई, धुन्धुका, घोघो आणि सानंद.

ह्या जिल्ह्याचे उत्तर भागांत लहान लहान टेंकड्या असून प्रदेश डोंगराळ आहे. अगदीं पश्चिमेकडच्या प्रदेशांत पूर फार येतात, ह्यामुळें तेथें शेतकी चांगली होत नाहीं. बाकी सर्व भाग सपाट व उघडा असून जमीन चांगली सुपीक आहे, व लागवडही चांगली होते. ह्या जिल्ह्यांत साबरमती शिवाय पुष्कळ लहान लहान नद्या असून पाण्याचा पुरवठा चांगला आहे.

**शहरें**—साबरमतीचे कांठीं अहमदाबाद, लोकसंख्या १,२४,७६७ हें मुंबई खेरीजकरून ह्या इलाख्यांत सर्वांत मोठें शहर आहे. हें सुलतान अहमद यानें सन १४११ त बांधिलें. हें गुजराथची पूर्वीची राजधानी होतें. येथें व्यापार पुष्कळ चालतो. येथील मश्रु, किनखाप, रेशीमकांठी धोतरजोडे आणि लुगडीं हीं प्रख्यात आहेत. येथील जुन्या इमारती पाहण्यासारख्या आहेत. विरमगांव, लोकसंख्या १८,९९० व धोल्का, लोकसंख्या १७,७१६ हीं शहरें ह्या जिल्ह्यांत आहेत. धोलरा, लोकसंख्या १०,३०१ हें बरेंच मोठें बंदर आहे. येथून उत्तरगुजराथेंतील सर्व माल रवाना होतो. घोघो, लोकसंख्या ७,०६३ हें दुसरें बंदर आहे. धन्धुका, लोकसंख्या १०,०४४ आणि प्रांतीज, लोकसंख्या ८,३५३ हीं बरींच मोठीं शहरें आहेत.

पात्रीजवळ खाराघोडा ह्मणून ठिकाण आहे तेथें मिठाचा मोठा कारखाना आहे, व तेथून मीठ आणण्याकरितां विरमगां-

वापासून एक आगगाडीचा फांटा नेला आहे. तेथील मीठ सर्व इलाख्यांत उत्तम असें ह्मणतात.

**खेडा जिल्हा.**—हा जिल्हा अहमदाबाद जिल्ह्याचे दक्षिणेस व पूर्वेस आणि महीनदीचे पश्चिमेस व उत्तरेस आहे. ह्यांत ७ तालुके आहेत त्यांचीं नांवें:–कपडवण्ज, ठासरा, नरिआद, मेहमदाबाद, मातर, आनंद, आणि बोरसाद.

ईशान्येचे बाजूस जमीन जरा उंच आहे, बाकी सर्व जिल्ह्यांत जमीन सपाट असून पाणी विपुल आहे. शेतकी उत्तम होते व लोकांचा मुख्य धंदा शेतकी हा आहे. मही आणि साबरमती ह्या दोन मुख्य नद्या आहेत. शिवाय वात्रक, मेश्वो आणि शेढी ह्या नद्या बऱ्याच मोठ्या असून महीला मिळतात.

**शहरें.**—खेडा, लोकसंख्या १२,६४० हें जिल्ह्याचें मुख्य ठाणें आहे. वात्रक आणि शेढी ह्या दोन नद्यांचे संगमावर खेड्याचा किल्ला आहे. नरिआद, लोकसंख्या २८,३०४ हें ह्या जिल्ह्यांत मोठें शहर आहे. कपडवण्ज, लोकसंख्या १४,४४२ हेंही बरेंच मोठें शहर आहे. येथें ग्लास आणि साबू ह्यांचे कारखाने आहेत. उमरेट, लोकसंख्या १४,६४३ बोरसद, लोकसंख्या १२,२२८ महुधा, लोकसंख्या ९,४४० आनंद, लोकसंख्या ९,२७१ व मेहमदाबाद, लोकसंख्या ८,१७३ हीं बरींच मोठीं शहरें आहेत. डाकूर, लोकसंख्या ७,७७१ येथें रणछोडजीचें देवालय आणि गोमतीकुंड आहे. येथें प्रतिपौर्णिमेस बरीच यात्रा भरते. आनंदपासून डाकूरपर्यंत रेलवेचा फांटा नेला आहे.

**२ पंचमहाल जिल्हा.**—हा जिल्हा महीनदीचे पूर्वेस आहे. रेवाकांठा एजन्सींतील बारिया संस्थानानें ह्या जिल्ह्याचे ईशान्य आणि नैर्ऋत्य असे दोन भाग झाले आहेत. ईशान्य-

भागापेक्षां नैर्ऋत्यभाग विशेष सुपीक आहे. हा प्रदेश उघाड असून पावगडचे डोंगरांशिवाय सपाट आहे. ह्याचे उत्तरेकडे कांहीं सुपीक खोरीं आहेत. परंतु जमीन एकंदरीनें डोंगराळ असून लागवड थोडी होते. लोकांचा धंदा शेतकी हा आहे.

ह्या जिल्ह्यांत सांगण्यासारखी नदी मही आहे व ह्यांत तीन तालुके आहेत, त्यांचीं नांवें:—गोद्रा, कलोल आणि दोहद. शिवाय ह्या जिल्ह्यांत दोन पेटे आहेत. गोद्रा, लोकसंख्या १२,३९४ व दोहद, लोकसंख्या १३,३४२ हीं दोन वरींच मोठीं शहरें आहेत. झालोद, लोकसंख्या ५,५७९ हा मोठा गांव आहे.

हा प्रांत पूर्वी शिंदे सरकारचे ताब्यांत होता, परंतु आतां इंग्रजसरकारच्या ताब्यांत आहे.

**४ भडोच जिल्हा.**—हा जिल्हा महीनदीचे दक्षिणेस व कीमनदीचे उत्तरेस आहे व ह्यांत ५ तालुके आहेत त्यांचीं नांवें:—भडोच, अंकलेश्वर, वाग्रा, अमोद आणि जंबूसर.

नर्मदेच्या मुखाजवळचें सुपीक मैदान, ह्या जिल्ह्यांत आहे. ह्या जिल्ह्यांत जंगल फारसें नाहीं परंतु झाडें पुष्कळ आहेत. लोकांचा मुख्य धंदा शेतकी हा आहे. नर्मदा, मही, आणि कीम ह्या मोठ्या नद्या ह्या जिल्ह्यांत आहेत.

**शहरें.**—भडोच, लोकसंख्या ३७,२८१ हें मुख्य शहर नर्मदेच्या मुखाजवळ आहे. येथें व्यापार मोठा चालतो जंबूसर, लोकसंख्या ११,४७९ आणि अंकलेश्वर, लोकसंख्या ९,५३५ हीं वरींच मोठीं शहरें आहेत. टंकारिया बंदर, जंबूसरपासून नऊ मैलांवर आहे.

धंतुरिया आणि कासवा हीं दोन बेटें नर्मदानदींत आहेत; पैकीं पहिल्यांत वस्ती आहे.

**५ सुरत जिल्हा.**—हा जिल्हा गुजराथेंत अगदीं दक्षिणे-

कडचा असून उत्तरेस कीमनदी व दक्षिणेस दमणगंगा ह्यांच्या मध्यें आहे. ह्यांत ८ तालुके आहेत त्यांचीं नांवें,–पार्डी, बलसाड, चिखली, जलालपूर, बारडोली, मांडवी, चौऱ्यायशी आणि ओलपाड.

दक्षिणेकडील प्रदेश खेरीजकरून ह्या जिल्ह्यांतील सर्व प्रदेश सपाट मैदान आहे. पश्चिम किनाऱ्यावर पुष्कळ खाड्या आहेत, त्या उघाडीचे दिवसांत बंदरांऐवजीं उपयोगीं पडतात. शेतकी आणि मासे धरणें, हे लोकांचे मुख्य धंदे आहेत. ह्या जिल्ह्यांत पुष्कळ नद्या आहेत पैकीं तापी सर्वांत मोठी आहे.

**शहरें.**—सुरत, लोकसंख्या १,०७,१५४ हें ह्या इलाख्यांत तिसरें मोठें शहर आहे. हें तापीनदीचे मुखाजवळ असून मोठें बंदर आहे, येथें व्यापार मोठा चालतो. इंग्लिश लोकांनीं आपली पहिली वखार, सन १६१२ त येथें स्थापिली. बलसाड लोकसंख्या १३,२२९ हेंही बरेंच मोठें बंदर आहे. येथें व्यापार बराच चालतो. ह्या बंदरांतून धान्य, गूळ, सागवानीं लांकूड वगैरे पुष्कळ जिन्नस परमुलखास रवाना होतात. रांदेर, वस्ती ९,४१६ हें तापीचे कांठीं आहे.

---

## भाग ९ वा.

## गुजराथेंतील संस्थानें.

हीं संस्थानें इंग्रज सरकारचे मुलखासभोंवतीं पसरलेलीं आहेत. ह्यांचें क्षेत्रफळ ५३,३७९ चौरसमैल व लोकसंख्या ६४,०९,९६५ आहे. ह्यांतील आठ भागांचें वर्णन अनुक्रमें पुढें केलें आहे.

### काठेवाड एजन्सी.

काठेवाड हें द्वीपकल्प कच्छचे रणाचे दक्षिणेस आहे. गाइ-

कवाड सरकारचे, अमरेली आणि ओखामंडल, हे महाल ह्याच प्रांतांत आहेत.

ह्यांत पांच पर्वत आहेत, त्यांत गिरनारचा पर्वत सर्वांत उंच आहे. त्याची उंची ३,५०० फूट आहे. भादर, शेत्रंजी आणि मच्छू ह्या मुख्य नद्या आहेत.

कामाच्या व्यवस्थेकरितां ह्याचे चार भाग केले आहेत त्यांस प्रांत असें ह्मणतात. ह्या प्रांतांवर एक पोलिटिकल एजंत असतो तो राजकोट येथें राहून सर्व प्रांतांची व्यवस्था पाहतो. त्याचे हाताखालीं चार असिस्तंत पोलिटिकल एजंत असतात व त्या प्रत्येकाच्या ताब्यांत एक एक प्रांत असतो.

**प्रांत १ ला.** झालावाडा, ह्यांतील संस्थानें, झाल जातीचे रजपूत घराण्याकडे आहेत. त्यांत ध्रांगध्रा हें मुख्य आहे. येथील राजास राजेसाहेब असें ह्मणतात. शिवाय वाकानेर, वढवाण, लिमडी, वगैरे पुष्कळ संस्थानें आहेत.

**प्रांत २ रा.** सोरठ, ह्यांतील संस्थानें मुसलमान घराण्याकडे आहेत. त्यांत जुनागड हें मुख्य आहे. येथील राजास नवाब असें ह्मणतात. बांटवा, हें याच घराण्याकडे आहे. जाफराबाद, हें जंजिऱ्याचे हबशाकडे आहे. पोरबंदर हें जैठवा जातीचे रजपूत घराण्याकडे असून ह्याच प्रांतांत आहे.

**प्रांत ३ रा.** गोहिलवाड, ह्यांतील संस्थानें, गोहिल जातीचे रजपूत घराण्याकडे आहेत. त्यांत भावनगर हें मुख्य आहे. येथील राजास ठाकूर असें ह्मणतात. पालिटाणी हें संस्थान ह्याच प्रांतांत आहे.

**प्रांत ४ था.** हालर, ह्यांतील संस्थानें, जारिजा रजपूत घराण्याकडे आहेत. त्यांत नवानगर हें मुख्य आहे. येथील राजास जाम असें ह्मणतात. शिवाय, राजकोट, गोंडल, मोरवी, वगैरे दुसरीं संस्थानें पुष्कळ आहेत.

ह्या प्रांतांतून कापूस, लोंकर, तेल, गूळ, घोडे व जनावरें व्यापाराकरितां मुंबईस रवाना होतात. पोरबंदर येथील इमारतीचे दगडांच्या खाणी फार प्रसिद्ध आहेत.

## पालनपूर एजन्सी.

गुजराथचे उत्तरेकडील प्रदेश ह्यांत येतो व हा कच्छचे रणाचे पूर्वेस आहे. ह्याचे उत्तरेकडील व ईशान्येकडील प्रदेश डोंगराळ आहेत. बाकी सर्व सपाट मैदान असून त्यांत सर्व धान्यें पिकतात. शिवाय पालनपूर संस्थानांत ऊंस, कापूस व अफू ह्यांचें पीक होतें.

ह्यांत ११ संस्थानें आहेत. पैकीं पालनपूरचें संस्थान सर्वांत मोठें आहे. ह्याची लोकसंख्या २,३४,४०२ आहे व हें पठाण राजाच्या ताब्यांत आहे. राधनपूर हें दुसरें संस्थान. ह्याची लोकसंख्या ९८,१२९ आहे व हेंही पठाण राजाचे ताब्यांत आहे. बाकी संस्थानांपैकीं कांहीं रजपूत व कांहीं कोळी राजांचे ताब्यांत आहेत. डीसा येथें इंग्रज सरकारचे फौजेची छावणी असते.

ह्या प्रांतावर देखरेख ठेवण्याकरितां एक पोलितिकल सुपरिंतेंदेन्त असतो. तो पालनपूर येथें राहतो.

## महीकांठा एजन्सी.

गुजराथचा ईशान्य भाग, ह्या प्रांतांत येतो. ह्याचे उत्तरेस अबूचा पहाड, व पूर्वेस मेवाड प्रांत. ह्याचे उत्तरेस व पूर्वेस डोंगर असून जंगलें आहेत. बाकीचा प्रदेश सपाट आहे. ह्यांत साबरमती, वात्रक, हाथमती, खारी वगैरे पुष्कळ नद्या आहेत. ह्याचे ६ परगणे आहेत.

ह्या प्रांतांत ५९ जहागीरदार आहेत, पैकीं १८ रजपूत आणि बाकी कोळी जातीचे आहेत. ह्यांत ईदरचें संस्थान

सर्वांत मोठें आहे. हें रजपूत राजाच्या ताब्यांत आहे, त्यास महाराज असें ह्मणतात. ह्याची लोकसंख्या २,५८,४२९ आहे. मुख्य शहर ईदर, येथें महाराज राहतो. दांटा येथें संगमरवरी दगडांच्या खाणी आहेत.

ह्या प्रांतावर एक पोलितिकल एजन्त असतो. तो सादरा येथें राहतो.

## रेवाकांठा एजन्सी.

गुजराथचे पूर्वेकडील प्रदेश, ह्यांत येतो. ह्या प्रांतांत जागजागीं सपाट मैदानें आहेत. परंतु जमीन बहुतकरून उंच सखल असून डोंगराळ आहे, ह्यांत नर्मदा व मही, ह्या मोठ्या नद्या आहेत.

ह्या प्रांतांत पुष्कळ संस्थानें आहेत, पैकीं राजपिपळा हें सर्वांत मोठें आहे. ह्याची लोकसंख्या १,१४,७५६ आहे. हें रजपूत राजाचे ताब्यांत आहे, त्यास महाराज असें ह्मणतात व तो नादोद येथें राहतो. ह्या संस्थानांत मौल्यवान् दगड सांपडतात. छोटाउदेपूर, लुनावाडा, व देवगडबारीआ हीं बरींच मोठीं संस्थानें असून रजपूत राजांच्या ताब्यांत आहेत. बालासिनोर हें मुसलमान राजाच्या ताब्यांत आहे.

ह्या प्रांतांत सर्व प्रकारचीं धान्यें पिकतात. जंगलें फार असल्या कारणानें इमारतीचें लांकूड पुष्कळ होतें; कापूसही थोडथोडा पिकतो.

ह्या प्रांताची व्यवस्था पाहण्याकरितां एक पोलितिकल एजन्त असतो. तो बडोदें येथें राहतो.

## गाइकवाडाचें राज्य.

गाइकवाडाच्या राज्याचे भाग पुष्कळ ठिकाणीं आहेत. याचा मुख्य भाग, भडोच जिल्हा, आणि खेडा जिल्हा, पंचम-

हाल जिल्हा आणि रेवाकांठा एजन्सी ह्यांच्या मध्यें आहे. ह्या भागांत वडोदें शहर आहे. येथें गाइकवाड राहतो व येथील लोकसंख्या १,०१,८१८ आहे.

दुसरा भाग, सुरत जिल्ह्यांत आहे, त्याचे नवसरी, वल्लावी, बालेश्वर, तेलारी आणि गणदेवी वगैरे परगणे आहेत.

तिसरा भाग, काठेवाड प्रांतांत आहे, त्याचे अमरेली आणि ओखामंडल असे परगणे आहेत. ह्यांत अमरेली व द्वारका हीं मुख्य शहरें आहेत.

चौथा भाग, पालनपूर आणि महीकांठा एजन्स्या व अहमदाबाद आणि खेडा जिल्हे ह्यांच्यामध्यें आहे. ह्यांत पट्टण, सिंदपूर, मैसाना, कडी वगैरे मोठीं शहरें आहेत.

शिवाय खानदेश जिल्ह्यांतील वाजपूर तर्फेवर गाइकवाडाची मालकी आहे.

ह्या संस्थानांत सर्व प्रकारचीं धान्यें उत्पन्न होतात. शिवाय कापूस, ऊंस व अफू ह्यांचें पीक होतें. पुष्कळ ठिकाणीं कापड तयार होतें.

इंग्रज सरकारतर्फे बडोदें येथें एक स्पेशल कमिशनर व गवरनर जनरलचा एजन्त ह्या नांवाचा अधिकारी असतो; व तेथें इंग्रजसरकारची कांहीं फौजही असते. काठेवाड, रेवाकांठा, महीकांठा आणि पालनपूर ह्यांतील जहागीरदारांकडील गाइकवाडाची खंडणी, इंग्रजसरकार वसूल करून गाइकवाडास देतें.

## खंबायतचें संस्थान.

हें अहमदाबाद जिल्ह्याचे पश्चिमेस व महीनदीचे उत्तरेस आहे. येथील राजा, मोंगल घराण्यांतला असून त्याला नबाब असें ह्मणतात.

हें संस्थान खेड्याचे कलेक्तराचे ताब्यांत आहे. मुख्य शहर

खंबायत, हें महीनदीचे मुखाजवळ आहे, लोकसंख्या ३६,००७ आहे पैकीं सुमारें $\frac{2}{3}$ मुसलमान आहेत.

ह्या संस्थानांत कापसाचें कापड व सतरंज्या चांगल्या तयार होतात. सर्व प्रकारचीं धान्यें, तीळ, कापूस व अफू हें मुख्य उत्पन्न आहे. खंबायतचें बंदर मोडत चालल्यामुळें तेथील व्यापार कमी होत चालला आहे.

## पंचमहाल एजन्सी.

पंचमहालचे आग्नेयेस जें नारुकोटचें लहान संस्थान आहे, तें ह्यांत मोडतें. हा प्रदेश अगदीं रोगट आहे. त्यांत कोळी व दुसरे भिल्लासारखे रानटी लोक ( त्यांस नाईकरा असें ह्मणतात ) आहेत ते राहतात. येथील राजा, कोळी जातीचा आहे. तो पंचमहालांतील कलेक्तराचे ताब्यांत आहे. ह्या संस्थानांत थोडेंसें धान्य उत्पन्न होतें; परंतु व्यापाराचा मुख्य जिन्नस ह्याटला ह्मणजे इमारतीचें लांकूड होय.

## सुरत एजन्सी.

ह्याखालीं सचीन, वासदा आणि धरमपूर हीं संस्थानें आहेत. त्यांची व्यवस्था सुरतेचा कलेक्तर पाहतो. ह्या संस्थानाचे संबंधानें त्यास गवरनराचा एजन्त असें ह्मणतात.

**सचीन.**—ह्या संस्थानांत १७ गांव असून ते सुरत जिल्ह्याचे चौऱ्यायशीं तालुक्यांत पसरलेले आहेत. ह्याची लोकसंख्या १५,७२१ आहे, व हें नबाबाचे ताब्यांत आहे.

**वासदा.**—हें सुरत जिल्ह्याचे पूर्वेस आहे. ह्याची लोकसंख्या ३४,१२२ आहे. हें रजपूत राजाचे ताब्यांत आहे.

**धरमपूर.**—हें संस्थान सुरत जिल्ह्याचे पूर्वेस असून वासदा संस्थानचे दक्षिणेस आहे. ह्याची लोकसंख्या, १,०१,२८९ आहे. हें रजपूत राजाच्या ताब्यांत आहे व तो धरमपूर येथें

राहतो. वासदा व धरमपूर ह्यांतील जमीन डोंगराळ असून तींत जंगलही बरेंच आहे. तेथें इमारती लांकूड व शिसवीचें लांकूड पुष्कळ होतें. तांदूळ, नागली, ज्वारी, कडदण व ऊंस ह्यांचेंही पीक बरेंच होतें.

---

## भाग ६ वा.

### कोंकण.

सह्याद्रि पर्वत व समुद्र ह्यांचे मध्यें जी अरुंद जमिनीची पट्टी आहे, तिला कोंकण असें ह्मणतात. ह्या प्रदेशांत भाताचीं उंची खाचरें व नारळीचीं आगरें पुष्कळ आहेत. परंतु एकंदरीनें हा प्रदेश उंचसखल असून डोंगराळ आहे व जागजागीं तुटक तुटक डोंगर आहेत. जमिनीचा उंचसखलपणा व ओलसरपणा ह्यांमुळें ह्या प्रदेशांत झाडी चांगली होते, व लहान लहान सागाचीं झाडेंही पुष्कळ होतात. हा प्रदेश सुरतेपासून गोंव्यापर्यंत पसरला आहे व ह्याचे, ठाणें, जव्हार, कुलाबा, जंजिरा, रत्नागिरी आणि सांवतवाडी असे ६ विभाग आहेत.

**१ ठाणें जिल्हा.**—हा जिल्हा, सुरतजिल्हा आणि पोर्तुगीज लोकांचा दमण प्रांत ह्यांचे दक्षिणेस आहे. ह्यांत १० तालुके आहेत, त्यांचीं नांवें—डाहाणू, माहीम, वसई, साष्टी, वाडें, भिवंडी, कल्याण, शाहापूर, मुरबाड आणि कर्जत. शिवाय ह्या जिल्ह्यांत मोखाडें आणि उंबरगांव हे दोन पेटे ( महाल ) आहेत.

पूर्वेस व ईशान्येस जमीन उंच असून क्वचित् लागवड केलेली अशी आहे. समुद्रकिनाऱ्याजवळची जमीन सखल आहे, आणि जेथें समुद्राचें पाणी वाढत नाहीं तेथें पीक चांगलें येतें. ह्यांत नद्या सांगण्यासारख्या मोठ्या नाहींत. वसईची, दाति-

वऱ्याची वगैरे खाड्या ह्या जिल्ह्यांत आहेत त्यांतून थोडाबहुत गलबतांनीं व्यापार चालतो. दर्याकिनाऱ्यावरील गांवांत मासे मारणारे लोक पुष्कळ आहेत.

मुख्य शहर ठाणें, लोकसंख्या १४,४५६ हें साष्टीबेटांत आहे. वांद्रें, लोकसंख्या १४,९८७; भिवडी, लोकसंख्या १३,८३७; कल्याण, लोकसंख्या १२,९१०; आणि वसई, लोकसंख्या १०,३२७; हीं बरींच मोठीं शहरें आहेत. कल्याण येथें रेलवे कंपनीचा मोठा कारखाना आहे. वांद्रें येथून मुंबई व साष्टी या दोन बेटांत जाण्याकरितां दोन पूल बांधिले आहेत. वसई येथें एक भुईकोट किल्ला आहे, तो पूर्वी पोर्तुगीज लोकांचे ताब्यांत होता, येथें साखर करण्याचे कारखाने आहेत. शिवाय माहीम लोकसंख्या ७,१२२ आणि आगाशी लोकसंख्या ६,८२३ हीं मोठीं गांवें आहेत. आगाशी येथें सुकेळीं होतात, हा पदार्थ दुसरे कोणतेही स्थळीं होत नाहीं.

**२ जव्हार संस्थान.**—ह्याचे सभोंवताला ठाणें जिल्हा आहे, व ह्याचे तीन महाल आहेत. मुलुख जंगली व डोंगराळ आहे. भात, नागली, वरी, काठण वगैरे धान्यें पिकतात. रानांतील झाडांचेंही बरेंच उत्पन्न होतें. येथील राजा कोळी जातीचा आहे. हें संस्थान ठाण्याचे कलेक्तराच्या ताब्यांत आहे.

**३ कुलाबा जिल्हा.**—हा जिल्हा, ठाणें जिल्हा व मुंबईबंदर ह्यांचे दक्षिणेस आहे व ह्याचे ६ तालुके आहेत, त्यांचीं नांवें—अलिबाग, पनवेल, पेण, रोहें, माणगांव आणि महाड. शिवाय उरण हा एक पेटा आहे.

ह्या जिल्ह्यांत डोंगर पुष्कळ आहेत, पैकीं कांहीं फार उंच असून थेट पश्चिमेकडे गेले आहेत व कांहीं तुटक शिखरें आहेत. या जिल्ह्याचे उत्तरेकडे नागोठण्याची खाडी, पश्चिमेस

रोह्याची खाडी आणि दक्षिणेस बाणकोटची खाडी आहे. ह्यांत भरतीचें पाणी लांबवर जातें, ह्मणून ह्यांतून गलबतांनीं व्यापार पुष्कळ चालतो. भात पिकवणें, तेल काढणें, सुंभ तयार करणें, मासे मारणें आणि मीठ उत्पन्न करणें, हे लोकांचे मुख्य धंदे आहेत. रेशीम विणण्याचें काम, जें पोर्तुगीज लोकांनीं चालू केलें असें ह्मणतात, तें चौल येथें सुरू आहे. समुद्रकिनाऱ्यावर माडांचीं व सुपारीचीं मोठमोठीं आगरें आहेत.

अलिबाग, लोकसंख्या ६,२७६; हें ह्या जिल्ह्याचें ठाणें आहे. पनवेल, लोकसंख्या १०,३३१; आणि उरण लोकसंख्या १०,१४९; हीं बरींच मोठीं शहरें आहेत. पेण, लोकसंख्या ८,०८०; आणि महाड लोकसंख्या ६,८९४; ह्या ठिकाणीं भाताचा मोठा व्यापार चालतो. रेवदंडा, लोकसंख्या ६,९०८; चौल लोकसंख्या ५,३५५; आणि रोहें अष्टमी लोकसंख्या ४,८९४; हीं मोठीं गांवें आहेत.

**४ जंजिरा संस्थान.**—हें मुंबईहून रत्नागिरीस जातांना सुमारें अर्ध्या रस्त्यावर समुद्रकांठीं आहे. हें संस्थान व रत्नागिरी जिल्हा ह्यांचे दरम्यान बाणकोटची खाडी आहे.

हें संस्थान, सिद्दी ह्मणजे अबिसिनियन् राजाच्या ताब्यांत आहे. त्यास नवाब असें ह्मणतात. तो जंजिऱ्याचे किल्ल्यांत राहतो. जंजिरा येथें एक असिस्तंत पोलितिकल एजन्त असतो. तो कुलाब्याचे कलेक्तराचे हुकुमानें काम करितो. नबाबाची मालकी, काठ्यावाडांतील जाफराबादेवरही आहे.

लुगडीं विणण्याचें काम ह्या संस्थानांत होतें, व भात, नागली आणि मीठ, हीं पुष्कळ पिकतात.

**५ रत्नागिरी जिल्हा.**—हा कुलाबा जिल्हा आणि जंजिरा संस्थान ह्यांचे दक्षिणेस आहे, व ह्याचे ९ तालुके आहेत,

त्यांचीं नांवें—दापोली, खेड, चिपळूण, संगमेश्वर, रत्नागिरी, राजापूर, देवगड, मालवण आणि वेंगुर्लें. शिवाय ह्या जिल्ह्यांत मंडणगड व गुहागर असे दोन पेटे (महाल) आहेत.

सखल जमिनीपैकीं कांहीं भातखाचरें आहेत, तीं उंची आहेत, परंतु जमीन बहुतकरून वाईट असून खडकाळ आहे. ह्यांत डोंगर पुष्कळ आहेत. किनारा खाड्यांनीं व नद्यांनीं जागजागीं तुटलेला आहे. शेतकी, मासे मारणें, व चुना तयार करणें, हे लोकांचे मुख्य धंदे आहेत.

**रत्नागिरी.**—लोकसंख्या १२,६१६; हें बंदर असून जिल्ह्याचें मुख्य ठाणें आहे. मालवण, लोकसंख्या १५,५६५; चिपळूण लोकसंख्या १२,०६५;वेंगुर्लें, लोकसंख्या ८,९४७;आणि राजापूर, लोकसंख्या ७,४४८ हीं मोठीं बंदरें असून येथें व्यापार पुष्कळ चालतो. हर्णई, हेंही बंदर असून येथें किल्ला आहे. आचरें, मसुरें, देवरुख, संगमेश्वर, मालगुंड, गुहागर, खेड, मुरूड आणि बाणकोट हीं मोठीं गांवें आहेत.

**६ सांवतवाडी संस्थान.**—हें कोंकणपट्टींत अगदीं दक्षिणेकडे आहे व हें भोंसल्याच्या घराण्यापैकीं एका मराठी सरदाराच्या ताब्यांत आहे. इंग्रजसरकारचा पोलितिकल एजन्त सांवतवाडी येथें राहतो. सांवतवाडी येथें खेळाचें रंगीत सामान चांगलें तयार होतें. भात, नाचणी, वरी, नारळ व हिरडे ह्यांचें पुष्कळ पीक होतें.

---

## भाग ७ वा.

### देश.

सह्याद्रीचे पूर्वेकडील प्रदेशास देश ह्मणतात. हा प्रदेश सपाट असून त्यांतून मोठमोठ्या नद्या वाहतात. त्यांच्या कांठची

जमीन सुपीक आहे, परंतु हवा कोरडी असून पावसाचा नेम नसतो. सुव्रत्तेचे वर्षांतही पावसाळ्याखेरीज इतर दिवसांत मैदानें, ओसाड व उद्भिज्जरहित असतात.

**१ खानदेश जिल्हा.**—हा जिल्हा, ह्या इलाख्यांत मोठा आहे. ह्याचे उत्तरेस सातपुड्याचे डोंगर व दक्षिणेस सातमाळा किंवा अजिंठ्याचे डोंगर आहेत. ह्यांत १६ तालुके आहेत त्यांचीं नांवें—धुळें, अमळनेर, एरंडोल, पाचोरें, चाळिसगांव, पिंपळनेर, नंदुरबार, विरदेल, तळोदें, शहादें, शिरपूर, चोपडें, सावदें; भुसावळ, नसराबाद आणि जामनेर. शिवाय ह्या जिल्ह्यांत सहा पेटे आहेत त्यांचीं नांवें—यावल, रावेर, भडगांव, पारोळें, एदलाबाद आणि निजामपूर.

ह्या जिल्ह्याचा पूर्वेकडील भाग व मध्यभाग, कांहीं लहान लहान डोंगरांच्या ओळी खेरीज करून सपाट आहे; आणि जरी जागजागीं सुपीक शेतें आहेत तरी बहुतकरून सर्व प्रदेश ओसाड व उदास दिसतो. उत्तरेकडील व पश्चिमेकडील प्रदेश उंचवट्याचा असून त्यांत दाट झाडी आहे व त्यामध्यें भिल्ल लोक राहतात. ह्या जिल्ह्यांत मोठ्या नद्या, तापी, व तिला मिळणारी गिरणा ह्या आहेत. ह्या नद्यांचे कांठची जमीन बहुधा सुपीक व चांगली लागवड केलेली आहे. शेतकी हा लोकांचा मुख्य धंदा आहे; विणकामही पुष्कळ ठिकाणीं बरेंच चालतें.

धुळें, लोकसंख्या १८,४४९ हें जिल्ह्याचें मुख्य ठाणें आहे. चोपडें, लोकसंख्या १३,९३२; धरणगांव, लोकसंख्या १३,०८१; पारोळें, लोकसंख्या १२,३५४; एरंडोल, लोकसंख्या ११,५०१; नसराबाद, लोकसंख्या १०,२४३; जळगांव, लोकसंख्या ९,९१८; फैजपूर, लोकसंख्या ९,६४०; भुसावळ, लोकसंख्या ९,६१३; यावल, लोकसंख्या ८,८८०; आणि सावदें, लोकसंख्या ८,६४२;

हीं बरींच मोठीं शहरें आहेत, शिवाय अमळनेर, शिरपूर, रावेर, नंदुरबार, भडगांव, जामनेर, तळोदें, प्रकाशें, शेंदुरणी, शहादें, बोदवड आणि वरणगांव हीं मोठीं गांवें आहेत. भुसावळ येथें रेलवे कंपनीचा मोठा कारखाना आहे. येथून नागपुराकडे एक रेलवेचा फांटा नेला आहे.

**२ खानदेश एजन्सी.**—हा भाग खानदेश जिल्ह्याचे पश्चिमेस असून खानदेशचे कलेक्तराच्या ताब्यांत आहे. ह्याचे ३ विभाग आहेत.—१ डांगदेश, २ सुरगणतालुका, ३ मेवासी प्रांत.

**१ डांगदेश.**—हा मुलुख सह्याद्रीचे पश्चिमेस असून ७ भिल्ल सरदारांच्या ताब्यांत आहे. ह्यांत डोंगर फार असून मध्यें खोरीं आहेत व त्यांत दाट झाडी आहे. मुख्य उत्पन्न नानाप्रकारचे डीक व सागवानी इमारती लांकूड हें आहे. येथील लोकांची भाषा मराठी, गुजराथी आणि हिंदुस्थानी या तीन भाषा मिळून झाली आहे.

**२ सुरगण तालुका.**—हा डांगदेशाचे दक्षिणेस आहे. हा एका हिंदु सरदाराच्या ताब्यांत आहे, त्यास देशमुख असें ह्मणतात. ह्यांतील मुलूख डांगदेशाप्रमाणेंच आहे, परंतु ह्यांतील झाडी पुष्कळ तोडिली आहे.

**३ मेवासी प्रांत.**—हा प्रदेश खानदेशचे वायव्य कोनास, नर्मदा व तापी ह्या दोन नद्यांच्या दरम्यान आहे. हा सहा संस्थानिकांचे ताब्यांत आहे. ह्या प्रांतांत डांगदेशापेक्षां सुपीक जमीन पुष्कळ आहे, व ह्यांत दारू, मध, मेण, इमारती लांकूड व सर्व प्रकारचीं धान्यें ह्यांचें उत्पन्न होतें. येथील लोक बहुतकरून भिल्ल आहेत.

**३ नासिक जिल्हा.**—हा जिल्हा खानदेश जिल्ह्याचे द-

क्षिणेस आहे, व ह्यांत १२ तालुके आहेत त्यांचीं नांवें—बागलाण, कळवण, चांदवड, दिंडोरी, पेठ, नाशिक, इगतपुरी, सिन्नर, निफाड, येवलें, नांदगांव आणि मालेगांव.

पश्चिमेकडील सह्याद्रीजवळचा प्रदेश अगदीं डोंगराळ आहे. पूर्वेकडील प्रदेश उघाड व सपाट असून जमीन बहुधा उतरती आहे. ह्या जिल्ह्यांतील जमीन बहुतकरून उंची आहे परंतु तींत झाडें फारच थोडीं आहेत. चांदवडच्या डोंगरांनीं ह्या जिल्ह्याचे दोन भाग झाले आहेत. उत्तरेकडील भागांतून गिरणा नदी वाहते, आणि दक्षिणेकडील भागांतून गोदावरी नदी वाहते, शेतकी हा लोकांचा मुख्य धंदा आहे.

नाशिक, लोकसंख्या २४,१०१, हें जिल्ह्याचें मुख्य शहर गोदावरी नदीचे कांठीं आहे. येथील पितळेचें काम फार प्रसिद्ध आहे. यवलें, लोकसंख्या १७,०८५ येथें रेशीम व कलाबतू ह्यांचें काम फार चांगलें होतें. मालेगांव, लोकसंख्या १४,४०२ येथें इंग्रज सरकारचे फौजेचें ठाणें आहे व किल्ला आहे. शिवाय सिन्नर, इगतपुरी, चांदवड, मनमाड आणि विंचूर हीं मोठीं गांवें आहेत. त्र्यंबकेश्वर हें प्रख्यात देवस्थान ह्या जिल्ह्यांत आहे, येथें गोदावरी नदीचा उगम आहे.

**४ अहंमदनगर जिल्हा.**—हा जिल्हा नाशिक जिल्ह्याचे दक्षिणेस आहे, व ह्यांत ११ तालुके आहेत त्यांचीं नांवें-अकोलें, संगमनेर, कोपरगांव, राहुरी, नेवासें, शेवगांव, नगर, पारनेर, श्रीगोंदें, कर्जत आणि जामखेड.

ह्या जिल्ह्याचा पश्चिमेकडील भाग डोंगराळ आहे, आणि जमीन पश्चिमेकडून पूर्वेकडे उतरती आहे. उत्तरेकडील पाणी, गोदावरीला मिळतें व दक्षिणेकडील पाणी भीमेला मिळतें. शेतकी आणि विणणें हे लोकांचे मुख्य धंदे आहेत.

अहंमदनगर, हें जिल्ह्याचें मुख्य शहर सीनेचे कांठीं आहे; येथें लष्करी छावणी असते व एकंदर लोकसंख्या ३७,४९२ आहे. हें पूर्वी मुसलमानी राज्याची राजधानी होतें. येथें किल्ला आहे, व येथें लुगडीं चांगलीं तयार होतात. संगमनेर, लोकसंख्या ८,७०६ हें प्रवरेचे कांठीं आहे. शिवाय पाथर्डी, खर्डें, सोनई, श्रीगोंदें आणि भिंगार, हीं मोठीं गांवें आहेत.

९ **पुणें जिल्हा.**—हा जिल्हा अहंमदनगर जिल्ह्याच्या दक्षिणेस व पश्चिमेस आणि निरा नदीचे उत्तरेस आहे. ह्यांत ८ तालुके आहेत त्यांचीं नांवें–हवेली, पुरंदर, भिमथडी, इंदापर, जुन्नर, खेड, मावळ आणि शिरूर. शिवाय पौड, बारामती आणि घोडें हे तीन पेटे (महाल) आहेत.

ह्याचा पश्चिमेकडील प्रदेश अगदीं डोंगराळ आहे आणि जमीन पश्चिमेकडे उतरती आहे. ह्या जिल्ह्यांत पुष्कळ नद्या आहेत. त्या पूर्वेकडे वाहत जाऊन अखेर भीमेस मिळतात. भीमा ही भीमाशंकराजवळ उगम पावून ह्या जिल्ह्याचे पूर्वेकडून वाहत गेली आहे.

पुणें, लोकसंख्या ९९,६२२ हें जिल्ह्याचें मुख्य शहर मुळा आणि मुठा ह्यांचे संगमावर आहे. पुणें हें ह्या इलाख्यांत चवथें मोठें शहर आहे व हें पूर्वी पेशव्यांचे राजधानीचें शहर होतें. येथें रेशीम व कलाबतू ह्यांचें काम चांगलें होतें. येथें लुगडींही चांगलीं तयार होतात. पुण्याजवळ गणेशखिंडींत, गवरनर साहेबांचा बंगला आहे. पुण्यानजीक खडकी, घोरपडी व वानवडी ह्या ठिकाणीं फौजेचें मोठें ठाणें असतें व एकंदर लोकसंख्या ३७,३८१ आहे. जुन्नर लोकसंख्या १०,३७३ येथें लुगडीं व सुडाचे कागद चांगले तयार होतात. शिवाय इंदापूर, तळेगांव (ढमढेऱ्यांचें), खेड, सासवड, ओतूर, घोड-

नदी, तळेगांव (दाभाड्याचें), बारामती, घोडें, नारायणगांव आणि मंचर हीं गांवें आहेत. शेतकी व विणणें हे लोकांचे मुख्य धंदे आहेत.

**६ भोर संस्थान.**—हें संस्थान पंतसचीव नामक ब्राह्मण जहागीरदाराचें आहे. तो पूर्वी साताऱ्चे राजाचे ताब्यांत होता, हल्लीं ब्रिटिश सरकारचे ताब्यांत असून पुणें जिल्ह्याचा कलेक्टर हा एजन्त आहे.

हें पुणें जिल्ह्याचे नैर्ऋत्य कोणास आहे. घांटाचे पश्चिमउतरणीवरील (कोंकणांतील) कांहीं भागावर ह्या संस्थानची मालकी आहे. ह्यांतील जमीन डोंगराळ असून तींत जंगलही बरेंच आहे. ह्यांत तांदूळ, नागली, वरी, सावे, तीळ वगैरे जिन्नस पिकतात.

**७ सातारा जिल्हा.**—हा जिल्हा पुणें जिल्ह्याचे दक्षिणेस असून दोहोंच्या मध्यें निरा नदी आहे. त्यांत ११ तालुके आहेत त्यांचीं नांवें—जावळी, कऱ्हाड, कोरेगांव, खटाव, खानापूर, माण, पाटण, सातारा, तासगांव, वाई आणि वाळवें. शिवाय साताऱ्याजवळ महाबळेश्वरचे उंच प्रदेशांत मालकमपेंठ व खंडाळें हे दोन पेटे (महाल) आहेत.

ह्यांतील पुष्कळ भाग डोंगराळ असून जमीन पूर्वेच्या अंगास उतरती आहे. कृष्णा व तिला मिळणाऱ्या कोयना, वेण्या, व वारणा ह्या मुख्य नद्या आहेत. महाबळेश्वर येथें कृष्णा नदीचा उगम आहे. ह्या जिल्ह्याचे ईशान्य कोंपऱ्यास निरा नदी भीमेस मिळते. शेतकी व विणणें हे लोकांचे मुख्य धंदे आहेत.

सातारा, लोकसंख्या २९,०२८ हें जिल्ह्याचें मुख्य शहर आहे. येथें शिवाजीचे वंशज राज्य करीत होते व येथें एक डोंगरी किल्ला आहे. वाई, लोकसंख्या ११,६७६ व कऱ्हाड, लो-

कसंख्या १०,७७८ हीं शहरें कृष्णेच्या कांठीं आहेत. तासगांव, लोकसंख्या १०,२००; अष्टें, लोकसंख्या ९,५४८ आणि इसलामपूर, लोकसंख्या ८,९४९ हीं बरींच मोठीं शहरें आहेत. शिवाय नेर्लें, भिलवडी, रहिमतपूर; पेठ, म्हसवड कोळें, विटें आणि पाटण हीं मोठीं गांवें आहेत.

**८ सातारा एजन्सी.**—ह्या खालीं औंध आणि फळटण हीं संस्थानें आहेत. हीं पूर्वी साताराचे राजाचे ताब्यांत होतीं. परंतु हल्लीं ब्रिटिशसरकारचे ताब्यांत असून साताराचा कलेक्टर हा एजन्त आहे.

| | क्षेत्र. चौ. मै. | लोकसंख्या, |
|---|---|---|
| पंतप्रतिनिधि औंधचा जहागीरदार— ... | ४४७ | ५८,९१६ |
| निंबाळकर, फळटणचा... | ३९७ | ५८,४०२ |

औंध हें सातारा जिल्ह्याचे दाक्षिणेस व फळटण हें उत्तरेस आहे. भोंवतालच्या ब्रिटिश मुलखांत जें पीक होतें तेंच ह्या संस्थानांत होतें.

पंतप्रतिनिधि हा ब्राह्मण आहे व निंबाळकर हा मराठा आहे.

**९ सोलापूर जिल्हा.**—हा जिल्हा अहंमदनगर जिल्ह्याचे दक्षिणेस व पुणें व सातारा जिल्ह्यांचे पूर्वेस आहे. ह्यांत ७ तालुके आहेत त्यांचीं नांवें—करमाळें, बार्शी, माढें, सोलापूर, पंढरपूर, सांगोलें आणि माळशिरस.

बार्शी तालुक्याखेरीज इतर ठिकाणीं पाऊस थोडा पडतो व मुलूख ओसाड असल्याप्रमाणें दिसतो. ह्या जिल्ह्याची भाषा कोंकण व देश ह्यांतील भाषेप्रमाणेंच मराठी आहे. परंतु जिल्ह्याचे दक्षिणभागीं कानडीही बोलतात. शेतकी हा मुख्य धंदा आहे. मोठमोठ्या शहरीं व गांवीं विणकामही चालतें.

सोलापूर, लोकसंख्या ६१,२८१ हें जिल्ह्याचें मुख्य शहर आहे. येथें लुगडीं चांगलीं तयार होतात. बार्शी, लोकसंख्या १६,१२६ येथें कापसाचा व्यापार मोठा चालतो. पंढरपूर, लोकसंख्या १६,९१० येथें विठोबाचें प्रसिद्ध देवालय आहे, व येथें आषाढमासीं मोठी यात्रा भरते. शिवाय करकंब, वैराग, करमाळें, माढें, सांगोलें, मोहोळ आणि अकलूज हीं मोठीं गांवें आहेत.

**१० अक्कलकोट संस्थान.**—हें सोलापूर जिल्ह्याचे आग्नेयेस २२ मैलांवर आहे. ह्याचे उत्तरेस, पूर्वेस व दक्षिणेस निजामचें राज्य आहे. ह्यांतील जमीन उंचसखल असून त्यांतून पुष्कळ नद्या वाहतात; आणि पाऊसही बहुतकरून बराच पडतो. शेतकी व जाडें कापड विणणें हे लोकांचे मुख्य धंदे आहेत.

हें संस्थान पूर्वी सातारचे राजाचे ताब्यांत होतें, हल्लीं इंग्लिशांचे ताब्यांत आहे. राजा भोंसल्याचे घराण्यांतला आहे. सोलापूरचा कलेक्टर एजन्त या नात्यानें ह्या संस्थानची व्यवस्था पहातो.

---

## भाग ८ वा.

## दक्षिणमहाराष्ट्रदेश.

दक्षिणमहाराष्ट्रदेश हें नांव नवीन आहे. ह्यामध्यें महाराष्ट्रदेशाचा दक्षिणेकडील भाग व कर्नाटक प्रांत हे येतात. पूर्वी कृष्णा नदीचे दक्षिणेकडील भागास कर्नाटक ह्मणत असत. महाराष्ट्र आणि कर्नाटक ह्या प्रांतांमध्यें भेद काय तो भाषेचा निराळेपणा हा आहे.

कर्नाटकांत टेंकड्या किंवा लागवड करितां येणार नाहीं अशी जमीन नाहीं ह्मटलें तरी चालेल. कर्नाटकांत उत्तमप्रकारें लागवड केलेली अशी काळी किंवा कापसाची जमीन विपुल आहे.

**१ विजापूर जिल्हा.**—हा जिल्हा व सोलापूर जिल्हा आणि अक्कलकोट संस्थान ह्यांचेमध्यें भीमानदी आहे. ह्या जिल्ह्याचे पूर्वेस निजामचें राज्य, दक्षिणेस धारवाड जिल्हा आणि पश्चिमेस रामदुर्ग, मुधोळ, जमखिंडी आणि जत हीं संस्थानें आहेत. ह्यांत ८ तालुके आहेत त्यांचीं नांवें—बागलकोट, बदामी, हुनगुंद, मुद्देबिहाळ, सिंदगी, बागेवाडी, विजापूर आणि इंडी. शिवाय बिळगी हा एक पेटा आहे.

भीमानदी खेरीजकरून ह्या जिल्ह्यांत मोठ्या नद्या तीन आहेत. त्यांचीं नांवें—कृष्णा व तिला मिळणाऱ्या घटप्रभा व मलप्रभा. भीमानदी पुढें निजामचे राज्यांत कृष्णेसच मिळते. जमीन उंचसखल फार असून शिंदीच्या झाडांशिवाय तींत झाडें मुळींच नाहींत असें ह्मटलें तरी चालेल. शेतकी व कापड विणणें हे लोकांचे मुख्य धंदे आहेत. ह्या जिल्ह्यांत मुख्य भाषा कानडी आहे परंतु ब्राह्मण लोक सर्व ठिकाणीं मराठीही बोलतात. हिंदूंपैकीं बहुतेक लोक लिंगाईत जातीचे आहेत. अगदीं उत्तरेकडील तालुक्यांत बहुतकरून मराठीच बोलतात.

विजापूर, लोकसंख्या ११,४२४, हें जिल्ह्याचें मुख्य ठाणें आहे; हें औरंगजेबानें जिंकलेल्या एका मुसलमानी राज्याची राजधानी होतें. ह्या शहराची तटबंदी सहा मैलांहून लांब आहे, व ह्यांतील कांहीं जुन्या इमारती, रचनेनें व सौंदर्यानें फार आश्चर्यकारक आहेत. अहमदाबादेशिवाय अशा इमारती कोठेंही नाहींत. बागलकोट, लोकसंख्या १२,८५०; गुळेदगुड्ड, लोकसंख्या १०,६४८ आणि इलकल्ल, लोकसंख्या ९,५७४, हीं बरींच मोठीं शहरें आहेत. बदामी येथें एक भुईकोट किल्ला आहे.

**२ जत संस्थान.**—हें संस्थान डफळे नामक मराठे जहा-

गीरदाराचें आहे. हा पूर्वी साताऱ्चे-राजाचे ताब्यांत होता, हल्लीं ब्रितिशसरकारचे ताब्यांत असून विजापूर जिल्ह्याचा कलेक्तर हा एजन्त आहे. हें विजापूर जिल्ह्याचे पश्चिमेस आहे. भोंवतालचे ब्रितिशमुलखांत जें पीक होतें तेंच ह्या संस्थानांत होतें. शिवाय येथें सोरा व लोखंड हीं सांपडतात.

**२ बेळगांव जिल्हा.**—हा जिल्हा विजापूर जिल्ह्याचे पश्चिमेस आहे; ह्याचे पश्चिमेस, गोंवें, सांवतवाडी आणि कोल्हापूर; उत्तरेस मिरज, सांगली आणि जत; व पूर्वेस जमखिंडी, मुधोळ आणि रामदुर्ग हीं संस्थानें आहेत. ह्यांत ७ तालुके आहेत त्यांचीं नांवें—बेळगांव, चिकोडी, गोकाक, अथणी, संपगांव, बिडी आणि परसगड. शिवाय मुरगोड, हुकेरी आणि चंदगड हे तीन पेटे (महाल) आहेत.

लोक, मराटी व कानडी भाषा बोलतात. मराठी, मुख्यत्वेंकरून पश्चिमभागीं चालते, व कानडी पूर्वभागीं. दक्षिण व उत्तरभागीं दोन्ही भाषा चालतात. मुख्य नद्या ह्मटल्या ह्मणजे उत्तरेस कृष्णा, मध्यभागीं घटप्रभा, व दाक्षिणेस मलप्रभा ह्या आहेत. उत्तरेस व पूर्वेस जमीन मैदान असून चांगली आहे. परंतु दक्षिणेस सह्याद्रीचे फांटे मधून मधून आले आहेत, त्यावर कोठें कोठें झाडी दाट आहे.

लोकांचे मुख्य धंदे ह्मटले ह्मणजे शेतकी, सूत काढणें, विणणें, लांकडांचीं व धातूंचीं कामें करणें, मातीचीं भांडीं करणें व जोडे शिवणें, हे आहेत. कापड व रेशीम ह्यांचा व्यापार बराच चालतो.

बेळगांव, हें ह्या जिल्ह्याचें मुख्य शहर आहे. येथें लष्करची छावणी असते व एकंदर लोकसंख्या ३२,६९७ आहे. अथणी, लोकसंख्या ११,१८६ येथें कापसाचा मोठा व्यापार चालतो.

गोकाक, लोकसंख्या १०,३०७ येथील रंगीत सामान फार प्रसिद्ध आहे. येथें घटप्रभेचा प्रसिद्ध धबधबा आहे. निपाणी, लोकसंख्या ९,७७७ हें बरेंच मोठें शहर आहे. संवदत्ती, लोकसंख्या ७,१३३ येथें एलंमाचें देवालय आहे, व येथें प्रतिवर्षीं मोठी यात्रा भरते. शिवाय हॊंगल, संकेश्वर, कित्तूर, नंदगड, आणि यमकनमरडी हीं मोठीं गांवें आहेत.

बेळगांवचे दक्षिणेस एक मैलावर शहापूर ह्मणून एक बरेंच मोठें शहर आहे, तें सांगलीकरांचे ताब्यांत आहे व तेथें कापड व भांडीं चांगलीं तयार होतात व व्यापार मोठा चालतो.

**४ कोल्हापूर संस्थान.**—हें संस्थान, सातारा जिल्हा व वारणा नदी ह्यांचे दक्षिणेस व बेळगांव जिल्ह्याचे उत्तरेस व वायव्येस आहे. ह्याचे पश्चिमेस सह्याद्रीची ओळ असून पलीकडे रत्नागिरी जिल्हा व सांवतवाडी संस्थान हीं आहेत.

ह्यांत पाऊस फार पडतो. पंचगंगा वगैरे नद्यांचे कांठची जमीन फार सुपीक आहे व त्यांत सर्व प्रकारचीं धान्यें पिकतात. शेतकी, कापूस व लोंकर ह्यांचें जाडेंभरडें कापड तयार करणें व मातीचीं भांडी करणें, हे लोकांचे मुख्य धंदे आहेत. थोडेंसें लोखंडही ह्या संस्थानांत सांपडतें. ह्या संस्थानचे लोकांपैकीं सुमारें $\frac{3}{4}$ लोक मराठी भाषा बोलतात व बाकी कानडी बोलतात.

सातारचें संस्थान शिवाजीचे वडील घराण्याकडे होतें व हें संस्थान शिवाजीचे धाकटे घराण्याकडे आहे. येथील राजास महाराज असें ह्मणतात व ते अल्पवयी असल्यामुळें पोलितिकल एजन्त सर्व संस्थानची व्यवस्था पहातो.

महाराजांचे ताब्यांत पुष्कळ संस्थानिक आहेत, पैकीं विशाळगड, कागल, बावडें व इचलकरंजी येथील संस्थानिक मुख्य आहेत.

**५ दक्षिणमहाराष्ट्रांतील जहागिरी.**—ह्या जहागिरी पेशव्यांचे ताब्यांत होत्या. हल्लीं इंग्लिशांस खंडणी देतात. कोल्हापूर येथील पोलितिकल एजन्त ह्यांवर देखरेख टेवितो, ह्या जहागिरी पुढें लिहिल्याप्रमाणें आठ आहेत.

| जहागिरी. | क्षेत्र० चौ० मैल० | लोकसंख्या. |
|---|---|---|
| १ सांगली | ८९६ | १,९६,८३२ |
| २ जमखिंडी | ४९२ | ८३,९१७ |
| ३ मिरज (वडील घर) | ३४० | ६९,७३२ |
| ४ मिरज (धाकटें घर) | २०८ | ३०,५४१ |
| ५ कुरुंदवाड (वडील घर) | १८२ | ३५,१८७ |
| ६ कुरुंदवाड (धाकटें घर) | ११४ | २५,८११ |
| ७ मुधोळ | ३६२ | ५२,१६३ |
| ८ रामदुर्ग | १४० | २९,५७० |
| | एकूण २,७३४. | ५,२३,७५३ |

सांगली, जमखिंडी, मिरज व कुरुंदवाड, ह्या जहागिरी पटवर्धन नामक ब्राह्मणांच्या घराण्यांत आहेत; मुधोळ जहागीर घोरपडे नामक मराठ्याच्या घराण्यांत आहे, त्यास राजेसाहेब ह्मणतात; आणि रामदुर्ग ही जहागीर, भावेनामक ब्राह्मणाच्या घराण्यांत आहे. पटवर्धन जहागिरदारांचीं गांवें फार पसरलीं आहेत; उदाहरण—सांगली संस्थानाचा मंगळवेढें हा तालुका पंढरपुराजवळ भीमेच्या कांठीं आहे, व शिरहट्टी हा तालुका, ह्या इलाख्याच्या दक्षिणेस तुंगभद्रेच्या कांठीं आहे.

ह्या संस्थानांतील निम्मेपेक्षां अधिक लोक कानडी बोलतात; व बाकीचे मराठी बोलतात. शेतकी व जाडें कापड विणणें हे लोकांचे मुख्य धंदे आहेत.

**६ धारवाड जिल्हा.**—हा जिल्हा ह्या इलाख्याचे आग्नेय

कोनास असून बेळगांव व विजापूर ह्या जिल्ह्यांचे दक्षिणेस आहे. ह्यांत ११ तालुके आहेत त्यांचीं नांवें—धारवाड, नवलगुंद, रोण, गदग, हुबळी, कलघटकी, बंकापूर, करजगी, हानगल, राणिबेन्नूर आणि कोड. शिवाय नरगुंद, मुंडर्गी व मुगद हे तीन पेटे ( महाल ) आहेत.

सह्याद्रीजवळच्या पश्चिमेकडील भागाची जमीन उंचसखल व डोंगराळ आहे. परंतु पूर्वेकडे जरी कोठें कोठें टेंकड्या आहेत, तरी जमीन बहुतकरून सपाट असून काळी आहे. मुख्य नद्या ह्मटल्या ह्मणजे उत्तरेस मलप्रभा आणि दक्षिणेस तुंगभद्रा. निजामचे राज्यांत रायचुराचे पलीकडे तुंगभद्रा, कृष्णेला मिळते.

ह्या जिल्ह्याची भाषा कानडी आहे, व ह्यांत लिंगाईत लोक पुष्कळ आहेत. शेतकी हा लोकांचा मुख्य धंदा आहे.

धारवाड, लोकसंख्या २७,१९१ हें जिल्ह्याचें मुख्य ठाणें आहे. हुबळी, लोकसंख्या ३६,६७७ हें शहर कापड व रेशीम ह्यांचे कारखान्याकरितां प्रसिद्ध आहे. गदग, लोकसंख्या १७,००१; राणिबेन्नूर, लोकसंख्या १०,२०२, नरगुंद, लोकसंख्या ७,८७४ आणि नवलगुंद. लोकसंख्या ७,८१० हीं बरींच मोठीं शहरें आहेत. शिवाय गजेंद्रगड, बंकापूर, हांवेरी, मुळगुंद, आणि ब्याडगी हीं मोठीं गांवें आहेत.

**७ सावनूर जहागीर.**—ही धारवाडचे पूर्वेस आहे, व ही एका मुसलमान नबाबाची आहे. नबाब पठाण घराण्यांतील असून पूर्वी पेशव्यांचे ताब्यांत होता. हल्लीं धारवाडचा कलेक्टर मुंबई सरकारचा एजन्त ह्या नात्यानें ह्या जहागिरीची व्यवस्था पाहतो.

**८ उत्तरकानडा.**—हा जिल्हा मद्रास सरकारानें सन १८६१ सालीं मुंबई सरकारचे हवालीं केला. हा बेळगांवचे द-

क्षिणेस व धारवाडचे पश्चिमेस आहे. ह्यांत ८ तालुके आहेत त्यांचीं नांवें--कारवार, अंकोलें, कुमठा, होनावर, सिद्दापूर, शिर्सी, येल्लापूर आणि सुपें. शिवाय भटकळ, मुंडगोड आणि सुपें हे तीन पेटे ( महाल ) आहेत.

उत्तरकानड्याचे, घाटाखालची व घाटावरची जमीन असे दोन भाग आहेत. सह्याद्रिपर्वत, कोंकणांत समुद्रापासून जितका जवळ आहे त्यापेक्षां तो उत्तरकानड्यांत अधिक जवळ आहे. त्याचे पायथ्याजवळची जमिनीची पट्टी पांचपासून पंधरा मैल रुंदीची आहे. उत्तरकानड्यांत मुख्य देखावा ह्मटला ह्मणजे त्यांतील घाटावरचीं व घाटाखालचीं अरण्यें हा होय. सर्व जिल्ह्यांत नऊ नद्या आहेत, त्यांत तुंगभद्रेस मिळणारी वर्धा, व शरावती ह्या मुख्य आहेत. शरावती नदी, गेरसप्पाजवळ मोठ्या झपाट्यानें घाटावरून खालीं पडते. ह्या ठिकाणीं पुष्कळ धबधबे झाले आहेत; त्यांतील मोठा ८९० फूट उंचीचा आहे.

ह्या जिल्ह्याची भाषा कानडी आहे परंतु मराठी आणि कोंकणी ( मराठी आणि कानडी मिळून झालेली ) ह्याही भाषा विशेषेंकरून समुद्रकांठचे प्रदेशांत बोलतात. शेतकी हा लोकांचा मुख्य धंदा आहे.

कारवार, लोकसंख्या १३,७६१; कुमठा, लोकसंख्या १०,६२९ आणि होनावर लोकसंख्या ६,६५८ हीं बंदरें व्यापाराकरितां प्रसिद्ध आहेत. पावसाळ्यांत गलबतें ठेवण्यास सुरक्षित असें बंदर, मुंबई व कराची खेरीजकरून कारवार हें आहे. हल्याळ येथें इमारतीच्या लांकडांचा मोठा व्यापार चालतो. शिर्सी, येथें सुपारी, वेलदोडे, मिरीं आणि चंदन ह्यांचा मोठा व्यापार चालतो. गोकर्ण व बनवासी हीं प्रसिद्ध क्षेत्रें आहेत.

समाप्त.

